# NSS, SKM Gunjoti: News (बातम्या) **2017-18**

**Lokmat: 18.06.2017**

लोकमत

## राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिरात गुंजोटीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

[illegible]



राज्यस्तरीय प्रशिक्षणात सहभागी विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. डी.आर. कुलकर्णी, डॉ. राम कदम, डॉ. डी.पी.[illegible] व इतर.

[illegible]

Hello Osmanabad
Page No. 2 Jun 18, 2017
Powered by: eolego.com

**Lokmat : 22.06.2017**

शिक्षक सहभागी झाले होते.

**श्रीकृष्ण महाविद्यालय**

गुंजोटी : येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व नेहरु युवा केंद्राच्या वतीने योग दिनानिमित्त योग शिबीर घेण्यात आले. क्रीडा शिक्षक प्रा. डॉ. रमेश पात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित शिबिरार्थींना योग शिबिराचे धडे देण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, युवक कल्याण व क्रीडा विभागाच्या अन्नपूर्णा मोरे, डॉ. एम. जी. अंबुसे, डॉ. के. एम. लोहार, डॉ. आर. एस.

**Lokmat: 02.07.2017**

लोकमत

## 'डॉक्टर्स डे'निमित्त विविध कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

[illegible]

### गुंजोटीत डॉक्टरांचा सत्कार

[illegible]

Hello Osmanabad
Page No. 3 Jul 02, 2017
Powered by: eolego.com

**Lokmat: 02.07.2017**

शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

**१०० रोपांची लागवड**

गुंजोटी : येथील श्रीकृष्ण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांचा जन्मदिन कृषी दिन म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्त परिसरात विविध जातीच्या १०० रोपांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमास डॉ. दामोदर पतंगे, प्रभाकरराव हिरवे, डॉ. सुहास मोहरीर, राजशेखर माळगे, प्राचार्य डॉ. डी.आर. कुलकर्णी, डॉ. रमेश पात्रे, डॉ. राम कदम, प्रा. एन.जे. पवार, डॉ. एम.सी. खोत यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

**रुईभरमध्ये वृक्षारोपण**

# REPORT

## REGULAR ACTIVITY-2017-18

Dr. Babasheb Ambedkar Marathwada University, Aurangabad sactioned 300 students to NSS unit for regular activity and 150 students for special camp. For the academic year 2017-18, for regular activity 173 boys and 127girls registered. For special camp 88 boys and 62 girls registered. During this year different programmes were undertaken by the NSS unit of college as per the directions of University. For year 2017-18 Tree plantation, campus cleaning, Swachh Bharat Campaign, international yoga day, voter's awareness, AIDS awareness are the main activities. Date wise detailed explanation of some activities as follows.

- **International yoga Day:** The activities of NSS for the academic year 2017-18 began with the "international yoga Day" The yoga day was celebrated with great enthusiasm on 21.6.2017. Nehru Youth Center-Osmanabad associated with us for the celebration. All faculty members, students gathered together in indoor stadium of college to perform yoga. On 20.6.2017 campaign done to promote yoga, invitation letters send to junior college, grampanchayat, primary health centre and other institutions of village. Principal Dr. D.R. Kulkarni felicitated officers of Nehru Youth Centre and Dr. R. D. Patre physical director of college and yoga instructor for this program. By 7.30 am the exercise began with a simple meditation followed by suryanamskar. Dr. G. M. Rathod- head of botany department pointed out importance of yoga in order to remain physically fit and mentally alert. For the successful conduction of this event Dr. R. H. Kadam P.O. and Dr. D. P. Chavan P.O. took efforts.

- **Tree Plantation 1.7.2017 to 7.7.2017:** As per the circular of Government of Maharashtra and NSS unit of Dr. Babasheb Ambedkar Marathwada University, Aurangabad about plantation of 2 crore tress, college organised Tree Plantation Week in college campus from 1.7.2017 to 7.7.2017. Plantation program is inaugurated by planting neem tree by Hon. Secretary of Shrikrishna Education Society Dr. D. B. Patange. Hon. Shri P. N. Hirve vice-president of Shrikrishna Education Society, Hon. Dr. S.H. Mohrir Member Shrikrishna Education Society, and Principal Dr. D. R. Kulkarni has actively participated in the program. "ECO Club" is a voluntary group of teachers, students and office staff of college promotes the activities to save the environment. ECO Club performs various activities like

plantation, water harvesting, awareness about pollution among the students and village peoples. Eco club also take care of planted trees of college campus. Foundation of ECO Club is novel idea of Principal Dr. D. R. Kulkarni, Dr. R. H. Kadam P.O. and Dr. M. T. Suryawanshi Head-Depatment of Geography. Dr. R. H. Kadam P.O., Dr. D. P. Chavan P.O., Dr. M. G. Ambuse P.O. and students of NSS take care of planted trees of the campus. On 1 July 2017 NSS celebrated Doctors Day and Krishi Din on this occasion Dr. D.R. Kulkarni felicitated Hon. Dr. D. B. Patange and Hon. Dr. S.H. Mohrir.

- **Voters Enrolment Campaign:** On 7.7.2017 NSS of College organised voters enrolment camp. To sensitize the voters about importance of participating in electoral process voter's awareness rally was organized. The rally passed through the village where the students carried placards and spoke slogans for making people know about the importance and need of voting. The rally was inaugurated by Principal Dr. D. R. Kulkarni, Dr. R. D. Patre, Dr. R. H. Kadam P.O., Dr. D. P. Chavan P.O., Dr. M. G.Ambuse P.O., Teachers and NSS volunteers were present for the rally. Placards holding vehicle was the main attraction in the rally.

- **Cleanliness Pledge:** On 1.8.2017 at 10.30 am the NSS volunteers, teachers and office staff of the college gathered for a pledge in which the students swore that they would devote 2 hrs per week towards cleanliness. Dr. R. H. Kadam P.O. gave oath to the gathering. Dr. D. P. Chavan P.O., introduced Cleanliness campaign. Principal Dr. D. R. Kulkarni, Dr. R. D. Patre, teachers and office staff attended the function.

- **Visit to Orphanage Home and Cleanliness on 7.8.2017:** On 7.8.2017 NSS has organized a special trip to Tuljabhavani orphanage House- Ekurgawadi Ta. Omega for specially abled on the occasion of local festival 'Raksha Bandhan'. Muslim female students tie a Rakhi- a holy thread to the orphan boys as a symbol of National integration. On this occasion NSS of college served a light refreshment and fruits to the boys of house. After a short break students of NSS joined the cleanliness campaign and cleaned the campus of orphanage house. Principal Dr. D. R. Kulkarni, Dr. R.D. Patre, Dr. R. H. Kadam P.O., Dr. D. P. Chavan P.O., Dr. M. G. Ambuse P.O., DR. G. M. Rathod, Shri S.B. Kadere, Shri S.V. Deshmukh, Teachers and NSS volunteers were present at that time. On 14.8.2017 NSS volunteers of college organized a one day collage campus cleanliness activity on the occasion of Independence Day. Dr. R. H. Kadam gave instructions and suggestions to students

regarding cleanliness of college campus. Eradication of Parthenium grass, management of solid waste are the main activities of one day camp.

- **Prerna-2017 selection camp:** Mrs. Ambika Gavde of college selected for Prerna-leadership and development camp 17.8.2017 to 24.8.2017 at Nagpur. She is selected out of 6 applications.

- **Teacher's day:** Teachers day was celebrated by NSS students on 5.9.2017 in the function hall. The event started with offering floral tributes to Dr. Sarvapalli Radhakrishnan portrait. Following this all teachers were felicitated with a pen and flower as a token of love.

- **SRD/NRD Republic day parade selection:** SRD/NRD Republic day parade selection camp was organised by Dr. Babasheb Ambedkar Marathwada University, Aurangabad on 7.9.2017. Miss. Sarika Patil and Miss. Shubhangi Choudhari were selected at college level for this camp out of 14 applications. Miss. Shubhangi Choudhari participated in Republic day parade on 26.1.2018 at Mumbai.

- **NSS Day:** On 24.8.2017 NSS unit of college organized a lecture of Prof. R. N. Nigade-Former P.O., Dr. M.C. Khot was the president for this function. Both the speakers share their experiences as former program officer and encourage the students for social work. The lecture was followed by cleaning activity of the college campus.

- **Gandhi Jayanti:** NSS volunteers celebrated Gandhi Jayanti on 2.10.2017, a special lecture was organised which started with floral tribute to portrait of Mahatma Gandhi. Lecture was followed by an hour of Shramadan.

- **Blood Donation Camp:** Blood Donation Camp was organized on 15.7.2017., 161 blood donors donate blood in this camp. On 16.11.2017 blood donation camp was organized in collaboration with Shrikrishna Blood Bank. 48 blood donors donate blood in this camp. The camp was organized under the guidance of Hon. Dr. D. B. Patange. Principal Dr. D.R. Kulkarni, Head Master Shri G.K. Ghodke, Vice Principal of junior College shri T. S. Pawar took efforts for success of camp. On 25.11.2017 blood donation Camp was organized for P.G. Students 123 students donated blood in this camp. Another blood donation camp was organised on 19.12.2017., 29 donors donate blood in this camp.

- **World AIDS Day:** On 12.1.2018 on the occasion of World AIDS day NSS organized an Awareness Rally. Students tried to make villagers aware about AIDS and also explained the way to avoid it.

- **National Youth Day:** On 12.1.2018 NSS unit of college celebrated Birth Anniversary of Swami Vivekananda and Birth Anniversary of Rajmata Jijau Saheb. A special lecture was arranged on this occasion.

- **Republic day Celebration:** On 26.1.2018 college celebrated republic day on this day by NSS students a campus cleaning program was conducted.

- **Shivaji Jayanti**: On 19.2.2018 college celebrated Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti. NSS students celebrated this day with Shramdan.

# श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग
# अहवाल
### शैक्षणीक वर्ष २०१८-१९

श्रीकृष्ण महाविद्यालयाचा "राष्ट्रीय सेवा योजना" विभाग शै. वर्ष. १९९६-९७ पासून सुरु करण्यात आलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने महाविद्यालयास नियमित कार्यक्रमासाठी ३०० विद्यार्थी मंजुर केलेले असून विशेष शिबिरासाठी मंजूर संख्या १५० इतकी आहे. शै. वर्ष २०१८-१९ करीता विभागात नियमित कार्यक्रमासाठी १५३ मुले व १४७ मुली अशी एकुण ३०० विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली आहे. तसेच विशेष शिबीरा करीता ६९ मुले व ८१ मुली अशी एकुण १५० विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली होती व सर्व स्वयंसेवक दि. १२.१२.२०१८ ते १८.१२.२०१८ दरम्यान मौजे एकोंडी (ज) येथे संपन्न झालेल्या "जलसंवर्धन व जलव्यवस्थापन" या विशेष शिबीरासाठी हजर होते. विद्यापिठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत राबविले जाणारे सर्व कार्यक्रम विद्यापिठाच्या मार्गदर्शक तत्वानुसार व वेळोवेळी प्राप्त होणा-या सुचनांनुसार महाविद्यालयात व परीसरात परीणामकारक रित्या राबवण्यात येतात. यामध्ये प्रामुख्याने वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, अरोग्य शिबीर, परीसर स्वच्छता, स्वच्छ भारत अभियान, आंतरराष्ट्रीय योग दिवस, मतदान जनजागृती अभियान, कॅशलेस व्यवहार, जागतीक एडस् दिन, अंधश्रद्धा निर्मुलन इत्यादी कार्यक्रम राबवण्यात आले. तसेच विशेष दिनांनिमित्त महाविद्यालयात विविध कार्यक्रम साजरे करण्यात आले. कांही प्रमुख कार्यक्रमांचा अहवाल तारखेसह खाली देत आहोत.

**१) आंतरराष्ट्रीय योग दिवसः**

दि. २१.०६.२०१८ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या दि. १३.०६.२०१८ रोजीच्या पत्रानुसार आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाविद्यालयात दि. २१.०६.२०१८ रोजी योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील शिबिरासाठी "नेहरु युवा केंद्र" उस्मानाबाद यांचे सहकार्य लाभले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व "नेहरु युवा केंद्र" उस्मानाबाद (महाराष्ट्र राज्य) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्रांगणात दि. २१.०६.२०१८

रोजी सकाळी ७.०० वाजता योगशिबीराचे आयोजन करण्यात आले. सदरील शिबीराच्या यशस्वी आयोजनासाठी दि. २०.०६.२०१७ रोजी महाविद्यालयात प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली व नियोजन करण्यात आले.

गुंजोटी गावातील सरपंच, सदस्य व ग्रामस्थ तसेच विविध संस्थांचे प्रतिनिधी यांना दि. २०.०६.२०१८ रोजी प्रत्यक्ष भेटून तसेच पत्र देऊन शिबीरास उपस्थित राहण्याचे अवाहन करण्यात आले. तसेच परिसरातील सर्व शाळा, ज्युनिअर कॉलेज, सरकारी दवाखाना इत्यादी ठिकाणी भेटी देऊन तसेच पत्र देऊन योग शिबिरास उपस्थित राहण्याचे अवाहन करण्यात आले. यासाठी रा. से. यो. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम व डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे यांनी विशेष परीश्रम घेतले.

दि. २१.०६.२०१८ रोजी सकाळी ठिक ७.०० वाजता योग शिबीरास सुरुवात झाली. योग प्रशिक्षक म्हणून महाविद्यालयाचे क्रीडा प्रशिक्षक डॉ. आर. डी. पात्रे सर उपस्थित होते. शिबिरास महाविद्यालयाचे प्राचार्य, कर्मचारी, गावतील ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थीत होते. सकाळी ७.०० ते ८.१५ या वेळेत योगशिबीर पार पडले. शिबिराच्या शेवटी रा. से. यो. च्या वतीने सर्वांसाठी दुध व पाण्याची सोय करण्यात आली होती.

**२) वृक्षारोपणः**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांचे दि. १३.०६.२०१८ रोजीचे पत्र व मा. महाराष्ट्र शासन यांचे १३ कोटी वृक्षलागवड संकल्प याची पुर्तता करण्यासाठी महाविद्यालयात दि. ०१.०७.२०१८ ते दि. १५.०७.२०१८ दरम्यान वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन पंधरवाडा साजरा करण्यात आला. मागील कांही वर्षापासून सतत होणारे अवर्षण, अनियमित पर्जन्य, तसेच सतत पडणारा दुष्काळ व पाण्याचे दुर्भिक्ष्य व या सर्व बाबीचा विचार करता झाडांची मोठ्या प्रमाणात लागवड व त्याहीपेक्षा त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज ठरलेली आहे. वृक्षलागवडीचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन महाविद्यालयात शै. वर्ष. २०१४-१५ मध्येच प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, रा. से. यो. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, व भूगोल विभागाचे विभागप्रमुख डॉ. मिलिंद सुर्यवंशी यांच्या विचारातून व प्रयत्नातून महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी व रासेयो चे विद्यार्थी यांनी एकत्रितपणे "पर्यावरण मंडळाची" स्थापना केलेली आहे. या मंडळामार्फत महाविद्यालयात विविध पर्यावरण विषयक उपक्रम राबवले जातात. तसेच हे मंडळ दरवर्षी कांही झाडे दत्तक घेऊन त्यांचे संवर्धन करते. त्यामुळे महाविद्यालयाच्या परीसरात वृक्षांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. तसेच २०१६-१७ मध्ये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे "इको क्लब' ची स्थापना करण्यात आलेली आहे. याअंतर्गत रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम

कदम, डॉ. डी. पी. चव्हाण व डॉ. एम. जे. अंबुसे व विद्यार्थी महाविद्यालयाच्या परीसराची देखभाल करतात.

दि. ०१.०७.२०१८ रोजी महाविद्यालयात कृषी दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात वृक्षारोपण व परीसरातील आदर्श शेतक-यांचा सत्कार असे कार्यक्रम घेण्यात आले. दि. २६.०६.२०१८ पासून गुंजोटी परीसरात प्रत्यक्ष भेटी देऊन वृक्षलागवडीचे महत्व पटवुन देण्यात आले तसेच दि. ०१.०७.२०१८ रोजी महाविद्यालयात वृक्षलागवडीस उपस्थित राहणेचे अवाहन करण्यात आले. दि. ०१.०७.२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता संस्थेचे सचिव मा. डॉ. दामोदरजी पतंगे साहेब यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करुन सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. सदरील कार्यक्रमास संस्थेचे सर्व पदाधिकारी, गुंजोटी ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच व सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. आर. डी. पात्रे रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. एच. कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे व सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच शै. वर्ष. २०१८-१९ मध्ये रासेयो विभाग व रोटरी क्लब उमरगा यांच्यात परस्पर सहकार्याचा करार करण्यात आला व त्या अनुषंगाने रोटरी चे सर्व पदाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते. एक अनोखा उपक्रम सुद्धा या वेळेस राबवण्यात आला तो म्हणजे मागील वर्षी लावण्यात आलेल्या झाडाचा वाढदिवस सर्वांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. दि. ०१.०७.२०१८, ०५.०७.२०१८ व ०६.०७.२०१८ रोजी महाविद्यालयाच्या परीसरात १०० रोपे व दि. २५.०७.२०१८ रोजी दत्तक गाव मौजे एकोंडी येथे १८० रोपांची लागवड करण्यात आली. २०१८-१९ या शै. वर्षात किमान ३०० वृक्षांची लागवड करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. सदरील कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी रासेयो च्या कार्यक्रमाधिका-यांबरोबरच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, डॉ. आर. डी. पात्रे व लोकमतचे पत्रकार श्री. सिद्धु देशमुख यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**३) जागतिक लोकसंख्या दिनः**

दि. ११.०७.२०१८ रोजी भूगोल विभागाच्या मदतीने महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी हे होते तर प्रमुख वक्ते प्रा. आर. जी. कोळी यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. डॉ. आर. एच. कदम यांनी सुत्रसंचलन व डॉ. एम. टी. सुर्यवंशी यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. प्रा. बी. जी. बोटेवाड यांनी सर्वांचे आभार मानले. तदनंतर सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परीसरात श्रमदान करुन परीसर स्वच्छता केली.

**४) एकदिवसीय कार्यशाळा:**

महाविद्यालयाने "उन्नत भारतः २.०" या कार्यक्रमात सहभाग घेतला असून त्या अंतर्गत महाविद्यालयाने पाच गावे दत्तक घेतली आहेत. त्यामध्ये उमरगा तालुक्यातील एकोंडी (ज), कदेर, बेटजवळगा, गुगळगाव व गुंजोटी या गावांचा समावेश आहे. सदरील गावामध्ये जाऊन सर्व्हे करण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांची नोंदणी व एकदिवसीय कार्यशाळा दि. २०.०७.२०१८ रोजी घेण्यात आली. सदरील कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत दत्तक गावांमध्ये जाऊन प्रत्येक घराचा सर्वे कसा करावा याची माहीती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यशाळेत महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. व्ही. एस. होगाडे, डॉ. आर. एच. कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे यांनी मार्गदर्शन केले.

**५) बँक जनधन खाते:**

दि. २१.०७.२०१८ रोजी महाविद्यालयात महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या सहकार्याने ज्या विद्यार्थ्यांची कोणत्याही बँकेत खाती नाहीत त्यांचे बँकखाते काढून देण्यात आली. या कार्यक्रमासाठी बॅकेचे शाखाव्यवस्थापक, कर्मचारी व रासेयो चे कार्यक्रमाधिका-यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमात एकुण २० विद्यार्थ्यांची खाती काढण्यात आली.

**६) ग्रामसभा:**

मौजे एकोंडी हे रासेयो नी मागील ३ वर्षापासून दत्तक घेतलेले गाव असून, ग्रामस्थांच्या सहकार्याने वर्षभार विविध उपक्रम राबवले जातात. शासनाच्या विविध योजनांची माहीती दिली जाते, समाज प्रबोधन केले जाते, वृक्षारोपन व रक्तदान शिबीरांचे आयोजन केले जाते. वर्षभराच्या कामाचे नियोजन, उन्नत भारत योजनेचा शुभारंभ करण्यासाठी दि. २५.०७.२०१८ रोजी मौजे एकोंडी येथे ग्रामसेभेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील ग्रामसभेस संस्थेचे सचिव डॉ. डी. बी. पतंगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी. डॉ. आर. एच. कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे, रोटरी उमरगा चे पदाधिकारी, उन्नत भारत चे नोडल ऑफिसर डॉ. व्ही. एस. होगाडे, गावातील सरपंच, ग्रामसेवक, सदस्य, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**७) ग्रामसभा:**

"उन्नत भारतः २.०" या उपक्रमातील दत्तक गाव मौजे कदेर येथे दि. ३०.०७.२०१८ रोजी ग्रामसभा घेण्यात आली. या ग्रामसभेस महाविद्यालयाचे डॉ. जी.

एम. राठोड, डॉ. जे. ए. नन्नवरे, कार्यक्रमाधिकारी. डॉ. आर. एच. कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, उन्नत भारत चे नोडल ऑफिसर डॉ. व्ही. एस. होगाडे, गावातील सरपंच, ग्रामसेवक, सदस्य, व ग्रामस्थ उपस्थित होते.

**८) परिसर स्वच्छताः**

दि. ०१.०८.२०१८ रोजी महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा अंतर्गत परीसर स्वच्छ केला.

**९) ग्रामसभाः**

दि. १५.०८.२०१९ रोजी "उन्नत भारतः२.०" अंतर्गत दत्तक गांव "मौजे बेटजवळगा" येथे ग्रामसभा घेण्यात आली व गावातील "उन्नत भारत योजनेचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकांत गायकवाड (म. बसवेश्वर महाविद्यालय, लातूर) हे होते तर डॉ. डी. बी. पतंगे (सचीव, श्रीकृष्ण शिक्षण संस्था, गुंजोटी) यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

**१०) प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड चाचणीः**

प्राजासत्ताक दिनी होणा-या पथसंचलनासाठी पाठवायच्या स्वयंसेवकांची महाविद्यालयस्तरीय निवड चाचणी दि.२०.०८.२०१८ रोजी आयोजित करण्यात आली. तत्पुर्वी दि. १६.०८.२०१८ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत इच्छुक विद्यार्थ्यांचे अर्ज घेण्यात आले. यामध्ये एकुण १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व अर्ज केले. सर्व विद्यार्थ्यांचे दि. १६.०८.२०१८ ते १९.०८.२०१८ पर्यंत महाविद्यालयातील क्रीडा प्रशिक्षक डॉ. आर डी. पात्रे यांनी प्रशिक्षण दिले व दि. २०.०८.२०१८ रोजी अंतीम निवड चाचणी घेण्यात आली. या चाचणीत माने प्रदीप आप्पाराव या विद्यार्थ्याची निवड करण्यात आली व त्याला दि. २१.०८.२०१८ रोजी उस्मानाबाद येथे संपन्न होणा-या जिल्हास्तरीय निवड चाचणीसाठी पाठवण्यात आले. उस्मानाबाद येथे सदरील विद्यार्थ्याचे विद्यापीठस्तरावर होणा-या निवड चाचणीसाठी निवड झाली.

**११) विद्यापीठ वर्धापन दिनः**

२३ ऑगस्ट १९५८ रोजी मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली व १४ जानेवारी १९९४ रोजी विद्यापीठाचा नामविस्तार होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद असे नामकरण झाले. दि. २३ ऑगस्ट २०१८ रोजी महाविद्यालयाच्या परीसरात विद्यापीठाचा स्थापना दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून व वृक्षसंवर्धनाची गरज ओळखून श्रीकृष्ण संस्थेचे

सचिव मा. डॉ. दामोदरजी पतंगे साहेब यांनी स्वखर्चातून महाविद्यालयाच्या रासेयो विभागाला १०० वृक्षसंरक्षक दिले व सर्व वृक्षसंरक्षक सन्माननिय पाहुण्यांच्या हस्ते परिसरात असलेल्या नवीन रोपांना लावण्यात आले.

**१२) केरळ पुरग्रस्त मदत निधीः**

जुलै - ऑगस्ट २०१८ मध्ये केरळ राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या महप्रलायामुळे तेथील जनजीवन प्रभावीत झाले. संपुर्ण केरळ राज्यात खुप मोठ्या प्रमाणावर जिवीत व वित्त हानी झाली. पुरग्रस्तांना मदत करण्यासाठी संपुर्ण देशातून विवीध प्रकारची मदत करण्यात आली. महाविद्यालयातील रासेयो विभागाने याचाच एक भाग म्हणून गुंजोटी परीसरात दि. २४.०८.२०१८ रोजी "पुरग्रस्तांसाठी मदत निधी संकलन" फेरीचे आयोजन केले. या मदत फेरीचे उद्‌घाटन श्रीकृष्ण संस्थेचे सचिव मा. डॉ. दामोदरजी पतंगे साहेब यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या मदत फेरीत एकुण १५६५७/- रुपये इतकी रक्कम संकलित झाली. सदरील रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधी, केरळ राज्य या खात्यावर ऑनलाईन जमा करण्यात आली.

**१३) रक्षाबंधनः**

दरवर्षी महाविद्यालयाचे विद्यार्थी रक्षाबंधन हा सण अनाथ मुलांबरोबर सजरा करतात. दि. २७.०८.२०१८ रोजी मौजे एकुरगा वाडी येथील "तुळजाभवानी अनाथ, अपंग मतीमंद शाळेत रक्षाबंधन साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी परीसरातील झाडांना व अनाथ मुलांना राखी बांधून सामाजीक बांधीलकी जपण्याचा संदेश दिला. तसेच या कार्यक्रमात अनाथ विद्यार्थ्यांना फळवाटप सुद्धा करण्यात आले. तसेच हा दिवस श्रावण महिन्यातील सोमवारचा दिवस असल्याने उमरगा यथील महादेव मंदीर परीसरात भाविकांची खुप गर्दी असते. विद्यार्थ्यांनी मंदीराचा संपुर्ण परीसर यानिमित्ताने स्वच्छ केला.

**१४) स्वच्छ भारत सर्व्हे**

भारत सरकारच्या "स्वच्छ भारत सर्व्हे SSG 18" हे अभियान पं. स. उमरगा यांच्या सहकार्याने महाविद्यालयात राबविण्यात आले. या मध्ये स्मार्टफोन असणा-या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व आपला अभिप्राय नोंदवला.

**१५) आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसः**

दि. ०८.०९.२०१८ रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी हे अध्यक्षस्थानी होते तर प्रा. आर. जी. कोळी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**१६) श्रमदान व परिसर स्वच्छताः**

नियमीत कार्यक्रमाचा एक भाग म्हणून रासेयो च्या स्वयंसेवकांनी दि.१५.०९.२०१८ रोजी तसेच दि. २२.०९.२०१८ रोजी महाविद्यालयाच्या परिसरात श्रमदान केले व परिसर स्वच्छता केली.

**१७) राष्ट्रीय सेवा योजना दिवसः**

दि. २४ सप्टेंबर रोजी महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करून राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने दोन स्वयंसेवी संस्थांबरोबर परस्पर सहकार्याचा करार करण्यात आला. "अंधश्रद्धा निर्मुलन समिती, महाराष्ट्र राज्य व रोटरी क्लब उमरगा यांच्या सोबत विविध समाजोपयोगी कार्यासाठी परस्परांना सहकार्य करण्यासोबतच्या करारावर स्वाक्ष-या करण्यात आल्या. महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांनी स्वाक्ष-या केल्या तर अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या वतीने उस्मानाबाद जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. महेश मोटे व रोटरी क्लब उमरगा यांच्या वतीने रोटरी चे अध्यक्ष मा. संतराम मुर्जानी यांनी स्वाक्ष-या केल्या. यानंतर मान्यवरांच्या हस्ते रासेयोच्या संकल्पनेतील भारताच्या प्रतिमेचे उद्घाटन करण्यात आले. मागील एक वर्षापासून विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतील 'अनाथांसाठी मदत निधी" याद्वारे प्रत्येकाच्या वाढदिवशी जमा झालेली मदत एका बंद मदत पेटीत संकलित केली जात होती. ही मदत पेटी मान्यवरांच्या उपस्थितीत व संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे याच्या हस्ते उघडण्यात आली. सदरील पेटीत एकुण १०,४१५/- रुपये इतकी रक्कम संकलीत झाली होती. सदरील रक्कम हि पुर्णतः अनाथांसाठी वापरण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. यानंतर अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या राज्य कार्याध्यक्ष मा. रुकसाना मुल्ला यांचे "वयात येतानः विज्ञान व अंधश्रद्धा" या विषयावर सखोल असे मार्गदर्शन झाले. रासेयो च्या वतीने परीसरात "रुबेलाः लसीकरण" संबंधी जागरुकता निर्माण करण्यासंबंधीचे पत्रके छापून आणली होती त्या पत्रकांचे विमोचन सुद्धा या कार्यक्रमात करण्यात आले.

**१८) सर्जीकल स्ट्राईकः**

दि. २९.०९.२०१८ रोजी महाविद्यालयात सर्जीकल स्ट्राईक दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात परीसरातील सर्व आजी माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला. तसेच सैनिकांनी त्यांना आलेले लढाईतील अनुभव कथन केले. सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. डी. पी. चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. एस. एस. बडोदकर यांनी केले.

**१९) गांधी जयंतीः**

दि. ०२/१०/२०१८ रोजी गांधी जयंतीनिम्मीत्त व्याख्यान आयोजीत करण्यात आले. तसेच राष्ट्रीय सेवा योजनच्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयातील परिसरात श्रमदान करण्यात आले.

**२०) फटाके मुक्त दिवाळीः**

प्रदुषण मुक्त दिपावली हा संकल्प घेऊन महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांनी व अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या सहकार्याने महाविद्यालयात फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ दि. ०१.११.२०१८ रोजी घेण्यात आली. तसेच यासंदर्भात फॉर्म पण भरण्यात आले.

**२१) रक्तदान शिबीरः**

दि. ०२.११.२०१८ रोजी महाविद्यालयात श्रीकृष्ण रक्तपेढी उमरगा व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात एकुण ३६ रक्तदात्यांनी स्वयंस्फुर्तीने रक्तदान केले. हे शिबीर यशस्वी करणेसाठी श्रीकृष्ण संस्थेचे सचिव मा. डॉ. दामोदर पतंगे, प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

**२२) जागतिक एडस दिनः**

दि. ०१.१२.२०१८ रोजी जागतीक एडस दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत गावातून रॅली काढण्यात आली तसेच एड्स पासून संरक्षण करण्यासंबंधीचे अवाहन व त्यासंबंधी घ्यावयाची काळजी यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

**२३) रासेयो नविन कार्यालयाचे उद्घाटनः**

दि. ११.१२.२०१८ रोजी महाविद्यालयात रासेयो च्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

**२४) अनाथांना कपडे वाटपः**

मागील एक वर्षापासून विद्यार्थ्यांच्या संकल्पनेतील 'अनाथांसाठी मदत निधी" याद्वारे प्रत्येकाच्या वाढदिवशी जमा झालेली मदत एका बंद मदत पेटीत संकलीत केली जात होती. ही मदत पेटी मान्यवरांच्या उपस्थितीत व संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे याच्या हस्ते उघडण्यात आली. सदरील पेटीत एकुण १०,४१५/- रुपये इतकी रक्कम संकलीत झाली होती. सदरील रक्कमेतून तुळजाभवानी अनाथ-अपंग व मतिमंद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना कपड्यांचे वाटप करण्यात आले. सदरील कार्यक्रम दि. १२.१२.२०१८ रोजी श्रीकृष्ण संस्थेचे सचीव डॉ. दामोदर पतंगे साहेब, प्राचार्य डॉ. डी. आर कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी, विद्यार्थी शाळेचे सर्व शिक्षक यांच्या उपस्थितीत पार पडला.

**२५) विशेष शिबीरः**

दि. १२.१२.२०१८ ते १८.१२.२०१८ दरम्यान रासेयो चे विशेष शिबीर मौजे एकोंडी येथे घेण्यात आले.

**२६) युवा दिनः**

दि. १२.०१.२०१९ रोजी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रमाता जिजाऊ साहेब यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

**२७) प्रजासत्तक दिनः**

दि. २६.०१.२०१९ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला व परीसरात श्रमदान करण्यात आले.

**२८) लोकशाही पंधरवाडाः**

मा. राज्य शासनाच्या आदेशानुसार व राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या दि. २०.१२.२०१८, ०२.०१.२०१९, ०७.०१.२०१ व १६.०१.२०१९ च्या पत्रानुसार श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी येथे राज्यशास्त्र विभाग, सांस्कृतीक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८.०१.२०१९ ते १०.०२.२०१९ दरम्यान विविध उपक्रम राबवून "लोकशाही पंधरवाडा" साजरा करण्यात आला. आपला देश जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे व आपल्या देशातील लोकशाही ही संपुर्ण जगात सर्वात जास्त भक्कम व यशस्वी असल्याचे आपल्या देशातील निवडणूक आयोगाने संपुर्ण जगाला दाखवून दिलेले आहे. आपल्या देशातील निवडणूक आयोगाची स्थापना दि. २५ जानेवारी १९५० रोजी झालेली असल्याने दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला

जातो. मतदारांमध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबवले जातात. देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. मतदार हा राजा आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदारांनी निवडणूकीत मतदानाचा पवित्र हक्क बजावला पाहिजे. हे या राष्ट्रीय मतदार दिवसाने अधोरेखित केलेले आहे. नवीन मतदारांमध्ये जागृतीसाठी हा दिवस साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने महाविद्यालयात विविध स्पर्धा, जनजागृतीचे कार्यक्रम प्रचार-प्रसार फेरी, प्रात्याक्षिक इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचा सविस्तर अहवाल खालील प्रमाणे देत आहोत.

**दि. २१.०१.२०१९: "व्याख्यान"**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील नवमतदार विद्यार्थ्यांसाठी मतदार जागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील डॉ. अनिल देशमुख हे या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते व मार्गदर्शक म्हणून लाभले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी हे होते तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. पी. चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दि. २२.०१.२०१९: "दिव्यांगासाठी उद्बोधन"**

दि. २२.०१.२०१९ रोजी इतिहास विभाग व रासेयो विभागाच्या वतीने महविद्यालयात "दिव्यांगासाठी उद्बोधन" शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या उद्बोधन शिबीरात प्रा. एस. एस. बडोदकर व प्रा. आर. एन. निगडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. बी. जी. बोटेवाड यांनी केले.

**दि. २३.०१.२०१९: "रांगोळी स्पर्धा"**

महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी "मतदार जनजागृती" या विषयावर रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी रांगोळीच्या माध्यमातून मतदानाचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भूगोल विभागाचे विभाग प्रमुख डॉ. एम. टी सुर्यवंशी यांनी विशेष प्रयत्न केले.

**दि. २४.०१.२०१९: "वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा"**

"लोकशाही व सुशासन" या विषयावर महाविद्यालयात दि. २४.०१.२०१९ रोजी वक्तृत्व स्पर्धा व तसेच निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. सदरील कार्यक्रम डॉ. डी. पी. चव्हाण व डॉ. एम. जी. अंबुसे यांच्या प्रयत्नातून यशस्वी पार पाडला.

**दि. २५.०१.२०१९: "मतदार शपथ व चित्ररथ फेरी"**

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून दि. २५.०१.२०१९ रोजी सकाळी १०.१५ वाजता महाविद्यालयात उपस्थित सर्व कर्मचारी व विद्यार्थी यांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मतदान जागरुकता "शपथ" देण्यात आली. ही शपथ कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. पी. चव्हाण यांनी दिली. ठिक १०.३० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या "मतदार जनजागृती चित्ररथाचे" उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले व प्राचार्यांनी "चित्ररथाला" हिरवा झेंडा दाखवून "प्रचार-प्रसार" फेरीस सुरवात केली. रासेयो चे स्वयंसेवक, कर्मचारी यांनी गावातून व परिसरातून मतदान जनजागृती केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. डी. आर. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन तर डॉ. आर. डी. पात्रे व श्री. सिद्राम देशमुख यांचे सहकार्य लाभले.

**दि. २६.०१.२०१९: "प्रजासत्ता दिन तसेच भित्तीपत्रक अनावरण"**

दि. २६.०१.२०१९ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या दर्शनी भागात "मतदार शपथ" या भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. सदरील "शपथ" कायमस्वरुपी भिंतीवर लावण्यात आलेली आहे. या भित्तीपत्रकाचे उद्घाटन संस्थेचे सचीव डॉ. दामोदर पतंगे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे सर्व सदस्य, प्राचार्य, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दि. ०१.०२.२०१९: "इव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन प्रात्याक्षिक"**

निवडणूक आयोग व तहसील कार्यालय उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात **"इव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन प्रात्याक्षिक"** चे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व नवीन पद्धतीची माहिती घेण्यात आली. मुख्य प्रशिक्षक श्री. बी. ए. कडगंचे यांनी सर्वांना प्रशिक्षण दिले.

## २९) शिवजयंती

दि. १९.०२.२०१९ रोजी महाविद्यालयात सेवा योजना विभागामार्फत शिवजयंती साजरी करण्यात आली व परिसरात श्रमदान करण्यात आले.

कार्यक्रमाधिकारी
PROGRAMME OFFICER
NATIONAL SERVICE SCHEME
SHRIKRISHNA MAHAVIDYALAYA GUNJOTI

प्राचार्य
PRINCIPAL
Shrikrishna Mahavidyalaya
Gunjoti Tq. Omerga

# NSS, SKM Gunjoti: News (बातम्या) 2017-18

### Pudhari: 09.08.2017



## तुळजाभवानी अनाथ बालगृहात रक्षाबंधन

### Sakal: 09.08.2017

## मुस्लिम मुलींनी अनाथांना बांधल्या राख्या



### Divyamarathi: 08.08.2017



आश्रमशाळेतील अनाथ मुलांना फळांचे वाटप

## गुंजोटीत मुस्लिम मुलींनी अनाथांना बांधली राखी



### उपजिल्हा रुग्णालयात रक्षाबंधन

### Sanchar: 08.08.2017

## अनाथाश्रमातील मुलांना राखी बांधून मुस्लीम मुलींनी केले रक्षाबंधन साजरे



# NSS, SKM Gunjoti: News (बातम्या) 2017-18

## Tarun Bharat: 09.07.2017

### गुंजोटी येथे चित्ररथाच्या माध्यमातून मतदार नोंदणी व मतदान जनजागृती



## Sakal: 09.07.2017

### गुंजोटीत चित्ररथातून मतदार जागृती



## Ekmat: 09.07.2017

### गुंजोटीत चित्ररथाच्या माध्यमातून मतदार जनजागृती





Nation Youth DAY and Rajmata Jijau Birth Anniversary - Celebration



Voters Awareness Vehicle




Voters Awareness Rally



Voters Awareness Rally



Yoga DAY




Rakshabandhan - Orphanage House



Kirtan - Special Camp



Health Camp - For Womens

### 7.1.4 Water Recycling





# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## स्वच्छ भारत अभियानाबाबत विद्यार्थ्यांकडून जनजागृती

▶ उमरगा, दि. ३१- उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने एकोंडी (ज.) येथे २१ ते २७ डिसेंबर या दरम्यान सुरु असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या या माध्यमातून स्वच्छ ग्राम व जलसंवर्धनासाठी युवा या शिबाराच्या माध्यमातून एकोंडी येथे स्वच्छ भारत मिशनअंतर्गत हागणदारीमुक्तीसाठी जनजागृती करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने एकोंडी येथे जलसंवर्धनाची कामे, अंतर्गत रस्ते निर्मिती, ग्रामसफाई, आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबीर, वृक्ष लागवडीचे महत्व, बेटी बचाव, बेटी पढावचा संदेश, सांस्कृतिक प्रबोधनपर कार्यक्रमासह हागणदारीमुक्तीसाठी गावातील प्रत्येक घरात जाऊन शौचालय बांधकामासाठी प्रवृत्त करण्यासाठीचे लेखी अर्ज प्रत्येक कुटुंबाकडून भरून घेऊन तशी जनजागृती करण्याचे कार्य शिबिरार्थिंनी केले.

***Name of the News Paper :*** दै संचार ***Date :*** 01/01/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात घेण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना प्रा. चंद्रकला भार्गव. मंचावर उपस्थित मान्यवर.

## मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा उत्साहात

गुंजोटी : उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती सप्ताह व मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. डी.आर. कुलकर्णी तर लातूर येथील प्रा. चंद्रकला भार्गव, सुजाता माने, प्रा.डॉ. ए.एम. चिश्ती, प्रा. प्रमोद चौधरी, प्रा. डॉ. रमेश पात्रे, आर.जी. कोळी, प्रा. पल्लवी कुंचगे, प्रा. वैष्णवी गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रा. भार्गव म्हणाल्या की, चांगली स्वप्न बाळगल्यास निश्चित ध्येयापर्यंत पोहचता येते. त्यासाठी अविरत प्रयत्नांची गरज असल्याचेही ते म्हणाले. सप्ताहादरम्यान मुलींसाठी क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, काव्य वाचन, सुगम गायन आदी कार्यक्रम घेण्यात आले.

***Name of the News Paper :*** दै लोकमत ***Date :*** 14/01/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CS CamScanner





उमरगा : श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव हरिपंत राखेलकर गुरुजी यांच्या स्मरणार्थ आयोजित व्याख्यानात बोलताना प्रा. इंद्रजित भालेराव. या वेळी डॉ. दामोदर पतंगे, जी. के. घोडके आदी. (दुसऱ्या छायाचित्रात) तालुकास्तरीय वादविवाद स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

# जन्मदात्यांच्या समर्पणाचे भान ठेवा : प्रा. इंद्रजित भालेराव

## श्रीकृष्ण विद्यालयात व्याख्यान, विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण

उमरगा, ता. २० (बातमीदार) : शेतीत राबराब राबणारा शेतकरी बाप आणि जन्मदात्या माऊलीचा त्याग व समर्पण यांचे भान ठेवून तरुण पिढीने वाटचाल करावी, असे मत प्रसिद्ध कवी प्रा. इंद्रजित भालेराव यांनी व्यक्त केले. तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव हरिपंत राखेलकर गुरुजी यांच्या स्मरणार्थ मंगळवारी (ता. १७) श्रीकृष्ण विद्यालयात आयोजित व्याख्यानात प्रा. भालेराव बोलत होते. 'वास्तव अनुभवांवर निर्मित कविताच हृदयाला भिडते. विद्यार्थ्यांनी त्यांच्या मातीशी ऋणानुबंध कायम ठेवावेत,' असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे अध्यक्षस्थानी होते.

येथे आयोजित तालुकास्तरीय वाद-विवाद स्पर्धेत डॉ. के. डी. शेंडगे इंग्लिश स्कूलच्या सृष्टी चव्हाण, श्रुती शिरगुरे यांनी प्रथम, महात्मा बसवेश्वर विद्यालयाच्या राजनंदिनी चव्हाण, तुजा जगताप हिने द्वितीय तर शरणप्पा मलंग विद्यालयाच्या अश्विनी रेऊरे व वैशाली हंबळे यांनी तृतीय क्रमांक मिळविला. प्रा. लक्ष्मण बिराजदार, प्रा. आर. एन. निगडे, एम. टी. माने यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. मुख्याध्यापक घोडके, एस. व्ही. सावंत व परीक्षकांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले. बुधवारी (ता. १८) आयोजित विविध कला-गुणदर्शन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कारांचे सादरीकरण केले. व्ही. व्ही. जाधव लिखित जी. एन. सूर्यवंशी दिग्दर्शित 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' ही एकांकिका विद्यार्थ्यांनी सादर केली. यावेळी मुख्याध्यापक सुरेखा भोसले, संस्थेच्या सहसचिव मंदाकिनी पाटील उपस्थित होते. कार्यक्रमासाठी उषा सगर, रत्नमाला जगताप, वर्षा हंचाटे, श्रीमती हुणे, एल. आर. पाटील, मल्लिनाथ पाटील यांनी पुढाकार घेतला.

**Name of the News Paper :** दै सकाळ **Date :** 21/01/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

Dr. R. S. Madale
Dr. R. D. Patre
Dr. V. S. Hogade
Dr. B. J. Ugale
Dr. R. H. Kadam
Dr. D. P. Chavan
Dr. Miss Ambuse M. G.
Mr. I. S. Inamdar

1545575 63

Library
Zoology
Botany

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## उमरगा येथे अपूर्व विज्ञान मेळाव्याला प्रतिसाद



अपूर्व विज्ञान मेळाव्यात २०० बालवैज्ञानिकांचा सहभाग.

**गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात कार्यक्रम** : उमरगा तालुक्यातील श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी येथे मंगळवारी (दि.२८) आयोजित दिव्यांगांसाठी विज्ञान या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ उपकेंद्र उस्मानाबाद येथील प्रा. डॉ. जे. ए. कुलकर्णी. तर प्रमुख उपस्थितीत डॉ. सुहास मोहरीर, प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, विज्ञान मंडळाचे प्रमुख डॉ. डी. पी. चव्हाण, सदस्य डॉ. राम कदम, डॉ. एम. जे. अंबुसे आदींची उपस्थिती होती.

***Name of the News Paper :*** दै. दिव्य मराठी ***Date :*** 03/03/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी व महाराष्ट्र महिला आयोग मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी 'कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम-२०१३' विषयी जागृती शिबीर घेण्यात आले.

## महिलांनी अत्याचाराला बळी पडू नये : सुजाता माने

गुंजोटी : कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ प्रतिबंध मनाई आणि संरक्षण कायदा-२०१३ च्या अनुसंगाने महिलांनी जागृत होणे आवश्यक आहे .मुलींनी स्वत:ची फसवणूक करून न घेता कोणत्याही अत्याचाराला बळी पडू नये, असे प्रतिपादन लातूर येथील ॲड. सुजाता माने यांनी केले.

श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी व महाराष्ट्र महिला आयोग मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी 'कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम-२०१३' विषयी जागृती शिबीर घेण्यात आले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उमरगा येथील ॲड. शुभदा पोतदार तर प्रमुख अतिथी म्हणून ॲड. एन. के. जोशी, प्रभाकरराव हिरवे, प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीचे अध्यक्षा प्रा. डॉ. आसिया चिश्ती, डॉ. एम. जी. अंबुसे, प्रा. पल्लवी कुंचगे, प्रा. विनश्री गायकवाड, प्रा. ज्योती शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी ॲड. माने म्हणाल्या की, कायदा तुमच्या पाठीशी आहे, तुम्ही नि:भींडपणे कोणत्याही अन्यायाला सामोरे जाऊ शकता. महाविद्यालयातील स्थापित समितीमार्फत तुम्ही तक्रार नोंदवू शकता, असे सांगत महाविद्यालयीन मुला-मुलींनी महाविद्यालयातील भयमुक्त व निकोप वातावरणात शिक्षण घ्या, असेही त्या म्हणाल्या. सूत्रसंचालन डॉ. ए. एम. चिश्ती तर आभार प्रा. विनश्री गायकवाड यांनी मानले.

◆ गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात घेण्यात आलेल्या शिबिरात बोलताना ॲड. सुजाता माने. मंचावर शुभदा पोतदार, प्राचार्य डी. आर. कुलकर्णी आदी.

**Name of the News Paper :** दै लोकमत **Date :** 03/02/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषेत ग्रंथ दिंडीत सहभाग घेतला होता.

## मराठी भाषा सप्ताहनिमित्त गुंजोटी येथे ग्रंथदिंडी

प्रतिनिधी । उमरगा

गुंजोटी येथे मराठी भाषासप्ताहनिमित्त ग्रंथ दिंडी काढण्यात आली. उमरगा तालुक्यातील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने मराठीभाषा सप्ताहचे उद्घाटन मराठवाडा विभाग मसापचे उपाध्यक्ष प्रा. किरण सगर, श्रीकृष्ण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे यांच्या हस्ते करण्यात आले. समारंभास शुक्रवारी (दि.१७) सकाळी ७ वाजता श्रीकृष्ण महाविद्यालयापासून ग्रंथदिंडीला सुरुवात करण्यात आली. या दिंडीमध्ये प्रा. किरण सगर, संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, मराठीभाषा सप्ताहचे जिल्हा समनवयक प्रा. प्रमोद चौधरी, डॉ. अशिया चिश्ती, मुख्यध्यापक जी. के. घोडके, मुख्यध्यापीका सुरेखा भोसले व शाखेतील सर्व पदाधिकारी, कर्मचारी व श्रीकृष्ण शिक्षण संस्थेच्या सर्व विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**Name of the News Paper :** दै दिव्य मराठी **Date :** 18/02/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



मराठी भाषा सप्ताहानिमित्त गुंजोटी येथे शुक्रवारी काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीत सहभागी डॉ. दामोदर पतंगे, प्रा. किरण सगर, प्रा प्रमोद चौधरी आदी.

## गुंजोटी येथे ग्रंथ दिंडी

### सप्ताह : विविध कार्यक्रमांचे आयोजन

गुंजोटी : येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने आयोजित मराठीभाषा सप्ताहाचे शुक्रवारी मसापचे मराठवाडा विभाग उपाध्यक्ष प्रा. किरण सगर, श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीस प्रतिसाद मिळाला. तर सप्ताहनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी सकाळी श्रीकृष्ण महाविद्यालयापासून ते गुंजोटी गावातून ग्रंथदिंडीस प्रारंभ झाला. दिंडीमध्ये प्रा. किरण सगर, संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, मराठीभाषा सप्ताहाचे जिल्हा समन्वयक प्रा. प्रमोद चौधरी, डॉ. अशिया चिश्ती, मुख्यध्यापक जी. के. घोडके, मुख्यध्यापिका सुरेखा भोसले यांच्यासह सर्व शाखांचे पदाधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

या निमित्त ग्रंथ प्रदर्शनी, ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित भित्ती पत्रकाचे प्रकाशन झाले. उद्घाटन समारंभात प्रा. किरण सगर म्हणाले की, मराठी भाषेसमोरील आव्हाने व समस्या; त्यांच्या निराकरणासाठी भाषिक अस्मिता वाढली पाहिजे असे प्रतिपादन केले.

१७ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत या सप्ताहाचे आयोजन केले असून, मराठी भाषेच्या उत्सकर्षासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या ग्रंथदिंडीत विद्यार्थी वेगवेगळ्या वेशभूषा परिधान करून सहभागी झाले होते. ग्रंथदिंडी यशस्वी करण्यासाठी राजकुमार जाधव, परमेश्वर सुतार, डॉ. एम. सी खोत सुनीता पाटील, बालाजी पाटील, अविनाश पाटील आदींनी परिश्रम घेतले. (वार्ताहर)

***Name of the News Paper :*** दै. लोकमत ***Date :*** 18/2/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



मराठी भाषा सप्ताहानिमित्त गुंजोटी गावात ग्रंथदिंडीनिमित्त डॉ. दामोदर पतंगे, प्रा. किरण सगर, प्रा. प्रमोद चौधरीसह मान्यवर सहभागी झाले होते.

## मराठी भाषा सप्ताहानिमित्त ग्रंथदिंडी

**उमरगा :** गुंजोटी येथे मराठी भाषासप्ताह निमित्त ग्रंथ दिंडी काढण्यात आली. उमरगा तालुक्यातील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने मराठीभाषा सप्ताहचे उदघाटन मराठवाडा विभाग मसापचे उपाध्यक्ष प्रा. किरण सगर व श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे यांच्या हस्ते पार पडले. उदघाटन सभारंभाची सुरूवात (दि. १७) शुक्रवार रोजी सकाळी सात वाजता श्रीकृष्ण महाविद्यालया पासून ते गुंजोटी गावातून ग्रंथदिंडीला सुरूवात करण्यात आली. या दिंडीमध्ये प्रा. किरण सगर, संस्थेचे सचिव-डॉ. दामोदर पतंगे, महाविद्यालयाचे प्राचार्य-डॉ. डी. आर. कुलकर्णी, मराठीभाषा सप्ताहचे जिल्हा समनवयक-प्रा. प्रमोद चधरी, डॉ. अशिया चिश्ती, मुख्यध्यापक-जी. के. घोडके, मुख्यध्यापीका-सौ. सुरेखा भोसले सह सर्व शाखेचे पदाधिकारी, कर्मचारी व श्रीकृष्ण शिक्षण संस्थेच्या सर्व विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. या निमित्ताने ग्रंथ प्रदर्शनी ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित भीती पत्रकाचे प्रकाशन झाली. दि. १७ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत या सप्ताहाचे आयोजन केले असून मराठी भाषेच्या उत्सकर्षासाठी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या ग्रंथदिंडी दरम्यान विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वेशभुषा परिधान करून सहभागी झाले होते. यासाठी राजकुमार जाधव, परमेश्वर सुतार, डॉ. एम. सी. खोत श्रीमती सुनीता पाटील, बालाजी पाटील, अविनाश पाटील आदींनी परिश्रम घेतले.

***Name of the News Paper :*** दै लोकमत **Date :** 18/02/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CS CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा झाला. याप्रसंगी डॉ. दामोदर पतंगे, किरण सगर आदी उपस्थित होते.

गुंजोटी : मराठी भाषा गौरव दिन साजरा करा असे परिपत्रके काढावी लागत आहेत. परिपत्रके काढून मराठीभाषा दिन साजरा करण्याची वेळ आली आहे का? अशी वेळ आली असेल तर ही वेळ कोणी आणली हे विचार करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन उस्मानाबाद येथील कवी डी. के. शेख यांनी केले. उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालय व मराठवाडा साहित्य परिषदेच्या उमरगा शाखेच्या वतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिन सप्ताहच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे तर मसापचे उपाध्यक्ष किरण सगर, संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकरराव हिरवे, डॉ. सुहास मोहरीर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, जिल्हा समनवयक प्रा. प्रमोद चौधरी, डॉ. आशिया चिश्ती, जेष्ठ साहित्यिक प्रकाश बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. बालाजी बोटेवाड तर आभार डॉ. डी. पी. चव्हाण यांनी मानले.

***Name of the News Paper :*** दै लोकमत ***Date :*** 28/02/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



## गुंजोटीत भित्तीपत्रिका स्पर्धा

गुंजोटी येथे दिव्यांगांसाठी आयोजित विज्ञानावरील भित्तीपत्रिकेची पाहणी करताना डॉ. दामोदर पतंगे, डॉ. जे. ए. कुलकर्णी, प्राचार्य डी. आर. कुलकर्णी, डॉ. सुहास मोहरीर आदी.

**गुंजोटी** : उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात मंगळवारी दिव्यांगांसाठी विज्ञानावरील भित्तीपत्रिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ उपकेंद्रातील प्रा. डॉ. जे.ए. कुलकर्णी, डॉ सुहास मोहरीर, प्राचार्य डॉ.डी.आर. कुलकर्णी, विज्ञान मंडळाचे प्रमुख डॉ. डी. पी. चव्हाण, सदस्य डॉ. राम कदम, डॉ. एम. जे. अंबुसे आदींची उपस्थिती होती. यावेळी भित्ती पत्रकांची स्पर्धा घेण्यात आली. दुपारच्या सत्रात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

***Name of the News Paper :*** दै लोकमत ***Date :*** 01/03/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

4

**फास्ट न्यूज़**

## महिलांमध्ये जागृती होणे आवश्यक : सुजाता माने

गुंजोटी : कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ प्रतिबंध मनाई आणि संरक्षण कायदा २०१३ च्या अनुषंगाने महिलांनी जागृत होणे आवश्यक आहे. मुलींनी स्वतःची फसवणूक करून घेऊ नये, कोणत्याही अत्याचाराला बळी पडू नये असे प्रतिपादन लातूर येथील वकिल सुजाता माने यांनी केले. श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी व महाराष्ट्र महिला आयोग मुंबई



यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ मार्च रोजी आयोजित कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम २०१३ विषयी जागृती शिबिरात त्या बोलत होत्या. या शिबाराच्या अध्यक्षस्थानी उमरगा येथील वकिल शुभदा पोतदार तर प्रमुख उपस्थितीत वकिल एन. के.जोशी, संस्थेचे उपाध्यक्ष- प्रभाकरराव हिरवे, प्राचार्य डॉ. डि. आर. कुलकर्णी, अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीचे अध्यक्षा प्रा. डॉ. आसिया चिश्ती, डॉ. एम. जी. अंबुसे, प्रा. पल्लवी कुंचगे, प्रा. विनश्री गायकवाड, प्रा. ज्योती शिंदे सह मान्यवर उपस्थित होते. सुजाता माने पुढे म्हणाल्या की, कायदा तुमच्या पाठिशी आहे. तुम्ही निर्भिडपणे कोणत्याही अत्याचाराला सामोरे जाऊ शकता. महाविद्यालयातील स्थापित समिती मार्फत तुम्ही तक्रार नोंदवू शकता असे सांगत महाविद्यालयीन मुला-मुलींनी महाविद्यालयातील भयमुक्त व निकोप वातावरणात शिक्षण घ्यावे असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. ए. एम. चिश्ती तर आभार प्रा. विनश्री गायकवाड यांनी मानले.

***Name of the News Paper :*** दै एकमत ***Date :*** 02/03/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CS CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी येथे महिला संरक्षण बद्दल विद्यार्थ्यांना माहिती देतेवेळी महिला अॅडव्होकेट सुजाता माने, शुभदा पोतदार, प्राचार्य डी.आर. कुलकर्णी सह मान्यवर

## मुलींना दिले स्वसंरक्षणाचे धडे

उमरगा : तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालय, महाराष्ट्र महिला आयोगाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात महिला- मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले. 'कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियम २०१३ विषयी' जागृती शिबिराच्या अध्यक्षस्थानी उमरगा येथील वकील शुभदा पोतदार यांची उपस्थिती होती. तर विधीज्ञ एन. के. जोशी, संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकरराव हिरवे, प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, अंतर्गत महिला तक्रार निवारण सामितीच्या अध्यक्ष प्रा. डॉ. आसिया चिश्ती, डॉ. एम. जी. अंबुसे, प्रा. पल्लवी कुंभगे, प्रा. विनश्री गायकवाड, प्रा. ज्योती शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ए. एम. चिश्ती यांनी तर आभार प्रा. विनश्री गायकवाड यांनी मानले.

***Name of the News Paper :*** दै. लोकमत ***Date :*** 06/08/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

अवतीभवती



उमरगा : गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात नेहरू युवा मंडळातर्फे आयोजित 'पडोसी युवा संसद' तालुकास्तरीय कार्यक्रमात बोलताना प्रा. राजाराम निगडे. या वेळी डॉ. दिलीप कुलकर्णी, डॉ. असिया चिस्ते, गणेश नावडे, अपर्णा मोरे.

## नेहरू युवा मंडळातर्फे आयोजित पडोसी युवा संसद कार्यक्रमास प्रतिसाद

उमरगा, ता. ५ (बातमीदार) : तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या सभागृहात उस्मानाबादच्या नेहरू युवा मंडळातर्फे शुक्रवारी (ता. तीन) 'पडोसी युवा संसद' या तालुकास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नेहरू युवा मंडळाचे तालुका समन्वयक गणेश नावडे अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. दिलीप कुलकर्णी, डॉ. असिया चिस्ते, प्रा. राजाराम निगडे, अपर्णा मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी बोलताना प्रा. निगडे म्हणाले, की स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक प्रश्न जसेच्या तसे आजही समाजासमोर उभे राहिले असून त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी युवकांनी सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करावा. जीवनपद्धतीत अनेक बदल होत आहेत ते बदल ग्रामीण भागापर्यंत पोचविण्याची जबाबदारी युवकांची आहे, असे ते म्हणाले. या वेळी डॉ. कुलकर्णी, डॉ. चिस्ते, श्री. नावडे आदींची भाषणे झाली. कार्यक्रमाला तालुक्यातील नेहरू युवा मंडळाचे पदाधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते. अपर्णा मोरे हिने सूत्रसंचालन केले.

***Name of the News Paper :*** दै सकाळ ***Date :*** 06/03/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



गुंजोटी (ता. उमरगा) : चिमण्यांसाठी वृक्षांवर ठेवलेले भांडे.

## चिमणीपाखरांसाठी पाण्याची सोय

उमरगा, ता. २२ (बातमीदार) : जागतिक चिमणी दिनानिमित्त गुंजोटी (ता. उमरगा) येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या परिसरातील चिमणीपाखरांसाठी पाण्याची सोय करण्यात आली. श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या परिसरात चिमण्यांनी शेकडो घरटी बांधली आहेत. अनेक जातीच्या पक्ष्यांचा या ठिकाणी वावर आहे. जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधून महाविद्यालय परिसरात प्रत्येक झाडावर पक्ष्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख डॉ. गुलाब राठोड, डॉ. बालाजी कोनाळे, यतिराज कवठे उपस्थित होते.

***Name of the News Paper :*** दै सकाळ ***Date :*** 23/03/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

# राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिरात गुंजोटीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

उमरगा : कोल्हापूर येथे आयोजित 'आव्हान' या १० दिवसीय राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या शिबिरात महापूर, भूकंप, आग अशा अनेक अडचणीतून जनतेला सोडविण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणार्थींच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांनी सांगितले. प्रशिक्षणात स्वाती गुंजोटे, अलिशा



राज्यस्तरीय प्रशिक्षणात सहभागी विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. डी.आर. कुलकर्णी, डॉ. राम कदम, डॉ. डी.पी.चव्हाण व इतर.

गायकवाड, रितेश साळुंके, सतीश जाधव या विद्यार्थ्यांसह रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण यांनीही सहभाग नोंदविला. यानिमित्ताने महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. आर. डी. पात्रे, प्रा. प्रमोद चौधरी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

***Name of the News Paper :*** दै. लोकमत ***Date :*** 18/06/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## श्रीकृष्ण महाविद्यालयाचे सेवा योजना शिबिर

वार्ताहर

**गुंजोटी :** राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविला आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी कोल्हापूर येथे आयोजित आव्हान या दहा दिवशीय राज्यस्तरीय आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर येथे सहभाग नोंदवून या दरम्यान आपत्कालीन संकटामध्ये जनतेला महापूर, भूकंप,आग अशा अनेक अडचणीतून सोडविण्यासाठी प्रशिंक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाचा उपयोग आपल्या परिसरातील गावासाठी तर होणारच आहे. मात्र या प्रशिक्षणार्थींच्या माध्यमातून महाविद्यालयिन विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांनी सांगितले. या दि. ०१ जून ते १० जून दरम्यान होत आहे.

आपत्कालीन प्रशिक्षणासाठी स्वाती गुंजोटे, अलिशा गायकवाड, रितेश साळके, सतीश जाधव तर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिरी डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, डॉ. आर. डी. पात्रे, प्रा. प्रमोद चौधरीसह मान्यवर उपस्थित होते.

***Name of the News Paper :*** दै. एकमत ***Date :*** 19/06/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## डॉक्टरांना समाजात सन्मान मिळावा

### पतंगे : कार्यक्रमास प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

◆ 'डॉक्टर्स डे'च्या निमित्ताने समाजाप्रती सेवाभाव व्यक्त करण्यासाठी डॉ. मोरे यांनी स्वत: रक्तदान करून शिबिरास प्रारंभ केला. यावेळी अन्य डॉक्टरांनीही रक्तदान केले.

**उमरगा** : डॉक्टरांना समाजात सन्मान मिळावा. समाजाप्रती डॉक्टरांनी तत्पर सेवेचा भाव प्रकट करावा यासाठी प्रतिवर्षी १ जुलै हा 'डॉक्टर्स डे' म्हणून जगभर साजरा केला जातो, असे प्रतिपादन ज्येष्ठ शल्य विशारद डॉ. दामोदर पतंगे यांनी केले.

इंडियन मेडिकल असोसिएशन आणि रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. दीपा मोरे, रोटरी क्लबचे नूतन सचिव दीपक कवठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

'डॉक्टर्स डे'निमित्त येथे रक्तदान शिबीरही घेण्यात आले. असोसिएशनचे सचिव डॉ. मोरे यांनी यावेळी प्रास्ताविक केले. डॉ. उदय मोरे, डॉ. दीपक पोफळे, डॉ. सुचेता पोफळे यांच्यासह शहरातील डॉक्टर्स यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी अन्य मान्यवरांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी रोटरीचे मनीष सोनी, अमर परळकर, प्रा. मोरे, प्रा. अभयकुमार हिरास, फार्मासिस्ट असोसिएशनचे पदाधिकारी, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

***Name of the News Paper :*** दै. लोकमत ***Date :*** 02/07/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## 'डॉक्टर्स डे'निमित्त विविध कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**उस्मानाबाद** : येथील इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने 'डॉक्टर्स डे'निमित्त रक्तदान शिबिरासह वैद्यकीय व्यावसायिकांचा सत्कार करण्यात आला.

अध्यक्षस्थानी जि.प. अध्यक्ष नेताजी पाटील, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील, नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र खंदारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एकनाथ माले, जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. हणुमंत वडगावे आदी उपस्थित होते. यावेळी ४५ दात्यांनी रक्तदान केले. ज्येष्ठ वैद्यकीय व्यावसायिक डॉ. राघवेंद्र डंबळ यांना ४५ वर्षे रुग्णसेवेबद्दल संघटनेच्या वतीने जीवन गौरव पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. तसेच डॉ. मिलिंद पौळ व डॉ. नीता पौळ यांचा सामाजिक कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. अदिनाथ राजगुरू, सूत्रसंचालन दौलत निपाणीकर यांनी केले. डॉ. कुलदीप सस्ते यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. अभय शहापूरकर, डॉ. स्मिता शहापूरकर, डॉ. सुधीर मुळे, डॉ. दिग्गज दापके, डॉ. परवीन पल्ला, डॉ. ज्योती कानडे यांच्यासह आयएमएचे पदाधिकारी, डॉक्टर्स उपस्थित होते. याच कार्यक्रमात असोसिएशनच्या वतीने दरमहिन्याच्या ९ तारखेला सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत गरोदर मातांची मोफत तपासणी करण्याचा निर्णय जाहीर

### गुंजोटीत डॉक्टरांचा सत्कार

◆ गुंजोटी : उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात डॉक्टर-डेनिमित परिसरातील डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला. श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ दामोदर पतंगे यांच्या उपस्थितीत आयोजित कार्यक्रमास डॉ. सुहास मोहरीर, संस्था उपाध्यक्ष प्रभाकरराव हिरवे, संचालक राजशेखर माळगे, बी.आर. म्हेत्रे, प्राचार्य डी.आर. कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, डॉ. आर. डी. पात्रे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ.डी.पी.चव्हाण यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

***Name of the News Paper :*** दै. लोकमत ***Date :*** 02/07/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित २०० वृक्षाचे पूजन व संगोपन कार्यक्रमप्रसंगी डॉ. दामोदर पतंगे, प्रभाकरराव हिरवे, डॉ.सुहास मोहरीर आदी.

## गुंजोटीत वृक्षांचे पूजन

◆ गुंजोटी : वृक्ष हे मानवाचे सच्चे मित्र असून, संत तुकाराम महाराजांनी ४०० वर्षांपूर्वी जगाला असलेली पर्यावरणाची गरज आपल्या ओव्यांमधून पटवून दिली होती, असे प्रतिपादन श्रीकृष्ण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे यांनी केले. गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित २०० वृक्षाचे पूजन व संगोपन कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रभाकरराव हिरवे, डॉ.सुहास मोहरीर, राजशेखर माळगे, प्राचार्य डॉ.डी.आर. कुलकर्णी, डॉ.रमेश पात्रे, कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

***Name of the News Paper :*** दै लोकमत ***Date :*** 06/07/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## गुंजोटीत चित्ररथाच्या माध्यमातून मतदार जनजागृती



**गुंजोटी** : उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे (दि.७) शुक्रवार रोजी उमरगा तहसील कार्यालयाच्या आदेशानुसार श्रीकृष्ण महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. तत्पूर्वी चित्र रथाचे व बोलके घोष वाक्य फलकाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, डॉ. जी. एम. राठोड, डॉ. विलास होगाडे, डॉ. रमेश पात्रे, प्रा. एच. एस. भोसले, डॉ. एम. सी. खोत, प्रा. एन. जे. पवार, डॉ. पठाण, एन. एस. एस. चे डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. बी. जे. उगले, आय. एस. इनामदार, डॉ. डॉ. एम. अंबुसे, प्रा. बी. जे. बोटेवाड, प्रमोद शाईवालेसह आदी मान्यवर उपस्थित होते.

जनजागृती साठी चित्र रथाचे प्रारंभ श्रीकृष्ण महाविद्यालय येथून ते गुंजोटी तेथील मुख्य बाजारपेठ येथून संपूर्ण गावातून चित्र रथ जनजागृती करण्यात आला. या जनजागृती कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. आर .एन. निगडे, यतीराज कवठे, दिलीप कांबळे, नरसिंग जाधवसह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

***Name of the News Paper :*** दै. लोकमत ***Date :*** 09/07/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

# गुंजोटीत चित्ररथातून मतदार जागृती

**उमरगा, ता. ८ (बातमीदार)** : तालुक्यातील गुंजोटी येथे शुक्रवारी (ता. सात) सकाळी श्रीकृष्ण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मतदार जनजागृती सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले.

तहसील कार्यालयाच्या मतदार नोंदणी जागृती मोहिमेनिमित्त शुक्रवारी श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांच्या हस्ते चित्ररथाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, डॉ. जी. एम. राठोड, डॉ. विलास होगाडे, डॉ. रमेश पात्रे, डॉ. एम. सी. खोत, प्रा. एच. एस. भोसले, प्रा. एन. जे. पवार, डॉ. डी. एम. पठाण, राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. डी. पी.चव्हाण, डॉ. बी. जे. उगले, आय. एस. इनामदार, डॉ. अंबुसे, प्रा. बी. जे. बोटेवाड, प्रमोद शाईवाले आदी उपस्थित होते.

मतदार नोंदणी व मतदार जागृतीसाठी काढण्यात आलेल्या चित्ररथाचा प्रारंभ महाविद्यालयापासून करण्यात आला. गावातील मुख्य बाजारपेठ ते गावातील प्रमुख मार्गावरून तो काढण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रा. आर. एन. निगडे, यतीराज कवठे, दिलीप कांबळे, नरसिंग जाधव यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला.




**उमरगा : मतदार जागृतीसाठी शुक्रवारी काढण्यात आलेल्या चित्ररथाचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी. या वेळी प्राध्यापकांसह विद्यार्थी.**

***Name of the News Paper :*** दै सकाळ ***Date :*** 09/7/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



गुंजोटी येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनींनी अनाथ मुलांना राखी बांधत असतानाचे छायाचित्र.

## रासेयोच्या विद्यार्थिनींनी जपली राष्ट्रीय एकात्मता

लोकमत न्यूज नेटवर्क

गुंजोटी : येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या मुस्लिम मुलींनी लातूर रोडलगत असलेल्या एकुरगावाडी येथील तुळजाभवानी अनाथ, अपंग व मतिमंद बालग्रह येथे रक्षाबंधनानिमित्त ६० अनाथ मुलांना फळ वाटप व राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. दरम्यान, येथील अनाथ व अपंग विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन सादर केले.

खेळ, युवा मंत्रालय भारत सरकार व राष्ट्रीय सेवा योजना विभाग महाराष्ट्र सरकारच्या आदेशानुसार १ ते १५ ऑगष्ट स्वच्छता पंधरवडा म्हणून साजरा केला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागाच्या वतीने फळ वाटप, रक्षाबंधन व परिसर स्वच्छता उपक्रम राबविले. यामध्ये वैशिष्ट्य असे की, जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन महाविद्यालयातील मुस्लिम मुलींनी अनाथ मुलांना राखी बांधून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला.

यावेळी प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. जी. एम. राठोड, डॉ. एम. जी. अंबुसे, शशिकांत कदेरे, तुळजाभवानी बालगृहाचे संस्थापक गोविंद शिंदे, मुख्याध्यापक बालाजी शिंदे, अधीक्षक गजानन शेवाळे यांच्यासह महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

***Name of the News Paper :*** दै लोकमत ***Date :*** 08/08/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## अनाथाश्रमातील मुलांना राखी बांधून मुस्लीम मुलींनी केले रक्षाबंधन साजरे




संचार वृत्त सेवा

उमरगा, दि. ७ - तालुक्यातील गुंजोटी श्रीकृष्ण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील मुस्लीम मुलींनी एरकुरगावाडी येथील तुळजाभवानी अनाथ, अपंग व मतिमंद बालगृहातील ६० अनाथ मुलांना राखी बांधून फळेवाटप करुन रक्षाबंधन सण साजरा केला. जाती-पातीच्या भिंतीपलीकडील या अनोख्या उत्सवामुळे राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडून आले.

या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम , डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. जी. एम. राठोड, डॉ. एम. जी. अंबुसे, शशिकांत कंदेरे, तुळजाभवानी बालगृहाचे संस्थापक गोविंद शिंदे, मुख्यध्यापक बालाजी शिंदे, अधीक्षक गजानन शेवाळे यांच्यासह कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

***Name of the News Paper :*** दै. संचार ***Date :*** 08/08/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## गुंजोटीत शिक्षकांनी उचलला स्वच्छतेचा वसा

**प्रतिनिधी**

**उमरगा :** शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात कार्यरत राहून राष्ट्रबांधणी व देशभर स्वच्छते सारख्या उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळावे अशा उपक्रमातून चांगले संस्कार व्हावे या हेतूने उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्राध्यापकांनी शिक्षक दिनाचे औचित्य साधुन गुंजोटी येथील मुख्य रस्तापासून ते श्रीकृष्ण शिक्षण संस्था परिसर स्वच्छ केला.

यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, डॉ. विलास होगाडे, डॉ. रमेश पात्रे, राष्ट्रीय सेवा योजनेचे समनवयक डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. जी. एम. राठोड, प्राध्यापक, विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दत्तक गाव एकोंडी, इंद्रधनु वृद्धसेवा केंद्र, गुंजोटी व रामलिंग मुदगड येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याचे प्राचार्य कुलकर्णी यांनी सांगितले आहेत.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गुंजोटी व परिसरातील कुटुंबांना गृहभेटी देऊन शौचालय बांधकामासह शौचालय वापराचे फायदे यासाठी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार असल्याचे राम कदम यांनी सांगितले.

रस्ता व परिसर स्वच्छतेसाठी डॉ. सुनील पतंगे, डॉ. डी. एम. पठाण, डॉ. रमेश माळे, डॉ. महादेव खोत, डॉ. एम. जी. अंबुसे सह राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.


***Name of the News Paper :*** दै एकमत ***Date :*** 09/08/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



मुस्लिम मुलींनी एकुरगा येथील तुळजाभवानी अनाथ आश्रमातील मुलांना राखी बांधून सण साजरा केला.

सण | आश्रमशाळेतील अनाथ मुलांना फळांचे वाटप

## गुंजोटीत मुस्लिम मुलींनी अनाथांना बांधली राखी

प्रतिनिधी । उमरगा

तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मुस्लिम मुलींनी लातूररोड लगत असलेल्या एकुरगावाडी येथील तुळजाभवानी अनाथ, अपंग व मतिमंद आश्रमशाळेतील अनाथ मुलांना रक्षाबंधनाचे औचित्य साधून सोमवारी (दि.७) अनाथ मुलांना फळ वाटप करून रक्षाबंधन सण साजरा केला.

आश्रमशाळेतील अनाथ, अपंग, मतिमंद विद्यार्थ्यांनी यावेळी विविध गुणदर्शन सादर केले. त्यांनी सादर केलेल्या नाट्य व कलाकृती पाहून उपस्थितांचे मन हेलावून गेले तर मुलींना गहिवरून आले. श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या युवा मंत्रालय भारत सरकार व राष्ट्रीय सेवा योजना विभाग महाराष्ट्र सरकार आदेशानुसार एक ऑगस्ट ते पंधरा ऑगस्ट 'स्वच्छता पंधरवडा' म्हणून साजरा केला जात असून त्याचाच भाग म्हणून सोमवारी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने फळ वाटप, रक्षाबंधन व परिसर स्वच्छता उपक्रम राबविले. हा सण जाती धर्माच्या पलीकडे जाऊन मुस्लिम मुलींनी अनाथ मुलांना राखी बांधून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. जी. एम. राठोड, डॉ. एम. जी. अंबुसे आदी उपस्थित होते.

**Name of the News Paper :** दैनिक दिव्य मराठी **Date :** 09/08/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

# मुस्लिम मुलींनी अनाथांना बांधल्या राख्या

उमरगा, ता. १० (बातमीदार) : तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या मुस्लिम मुलींनी एकुरगावाडी येथील तुळजाभवानी अनाथ, अपंग व मतिमंद आश्रमशाळेतील साठ मुलांना रक्षाबंधनानिमित्त राखी बांधून आगळावेगळा उपक्रम घेतला. दरम्यान, येथील अनाथ व अपंग विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन सादर करून उपस्थितांची वाहवा मिळविली.

खेळ, युवा मंत्रालय भारत सरकार व राष्ट्रीय सेवा योजना विभाग महाराष्ट्र सरकारच्या आदेशानुसार एक ऑगस्ट ते १५ ऑगस्ट हा स्वच्छता पंधरवडा म्हणून साजरा केला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागाच्या वतीने फळवाटप, रक्षाबंधन व परिसर स्वच्छता उपक्रम या परिसरात राबविण्यात आला. जातिधर्माच्या पलीकडे जाऊन महाविद्यालयातील मुस्लिम मुलींनी अनाथ मुलांना राखी



उमरगा : गुंजोटी येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनींनी अनाथ मुलांना राखी बांधून राष्ट्रीय एकात्मतेबरोबरच नातं दृढ करण्याचा प्रयत्न केला.

बांधून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, कार्यक्रम अधिकारी डॉ. राम कदम, डॉ. डी. [illegible], डॉ. जी. एम. राठोड, डॉ. एम. जी. अंबुसे, [illegible] कदेरे, गोविंद शिंदे, मुख्याध्यापक बालाजी शिंदे, अधीक्षक गजानन शेवाळे व कर्मचारी उपस्थित होते.

***Name of the News Paper :*** दै. सकाळ ***Date :*** 11/08/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

# विज्ञान शाखेच्या वाढीव तुकडीला मान्यता द्या

**▪ श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सेनेचे निवेदन**

प्रतिनिधी । गुंजोटी

उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात विज्ञान शाखेच्या वाढीव तुकडीला मान्यता मिळत नसल्याने अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना व युवासेनेने महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप कुलकर्णी यांना निवेदन देऊन वाढीव तुकडीला मान्यतेची मागणी केली.

निवेदनानुसार गुंजोटीत ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजुरांची मुले शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना दुसरीकडे जाऊन शिक्षण घेणे शक्य नाही. त्यामुळे श्रीकृष्ण महाविद्यालयात विज्ञान शाखेच्या वाढीव तुकडीसाठी महाविद्यालयाने पाठपुरावा करावा तसेच विज्ञान शाखेची तुकडी मंजूर करावी, अन्यथा महाविद्यालय व विद्यापीठाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेनेने निवेदनातून दिला आहे. निवेदनावर शिवसेना शाखाप्रमुख योगेश शिंदे, युवासेना शाखाप्रमुख संतोष जाधव, गौरव माळगे, महेश शेटगार, सूरज जाधव, रवी भोसले, आकाश जमादार, संदीप पांढरे, शशांक कोळी आदींच्या स्वाक्षरी आहेत.



शिवसेनेच्या वतीने प्राचार्य दिलीप कुलकर्णी यांना निवेदन देण्यात आले.

**सद्य परिस्थिती :** महाविद्यालयात विज्ञान शाखेची १२० विद्यार्थ्यांसाठी मान्यताप्राप्त तुकडी आहे. त्यामध्ये ७० टक्के तालुक्यातील, ३० टक्के तालुक्याबाहेरील व २ टक्के राज्याबाहेरील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत आहे.

विनाअनुदानित नवीन तुकडीचा प्रस्ताव विद्यापीठाला पाठविला. विज्ञान शाखेच्या वाढीव तुकडीचाही प्रस्ताव दिली. मान्यता मिळाल्याबरोबर या तुकडीत प्रवेश देण्यात येतील.

-डी. आर. कुलकर्णी, प्राचार्य

**Name of the News Paper :** दै. दिव्य मराठी **Date :** 11/08/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## उमरगा येथे शिबिरात २५ दात्यांनी केले रक्तदान

**उमरगा** | येथील शिवाई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने मंगळवारी(दि.१५) स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शिवाई हॉस्पिटल येथे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. श्रीकृष्ण रक्तपेढीचे प्रमुख डॉ. दामोदर पतंगे यांच्या हस्ते रक्तदान शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. विजय बेडदुर्गे, डॉ. सारिका बेडदुर्गे, प्रा. अशोक दुधभाते, प्राचार्य जी. के. घोडके, शिवाई चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष बी. एच. बेडदुर्गे, उपाध्यक्ष अजय बेडदुर्गे, धनंजय बेडदुर्गे, अजित झंपले, बालाजी मंडले, मारुती जमादार, विलास मोरे आदींची उपस्थिती होती. डॉ. पतंगे यांनी मार्गदर्शन करताना गरजु रुग्णांना जीवदान देण्यासाठी रक्ताची आवश्यकता असून रक्तदानाचे महान कार्य करून माणुसकीचे नाते जपले पाहिजे, असे मत व्यक्त केले.

***Name of the News Paper :*** दिव्य मराठी ***Date :*** 18/8/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## रासेयोच्या गट समन्वयकपदी डॉ. राम कदम यांची निवड



**जळकोट** | जळकोटचे (ता. तुळजापूर) सुपुत्र तथा श्रीकृष्ण महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. राम कदम यांची राष्ट्रीय सेवा योजनेच्या गट समन्वयकपदी निवड करण्यात आली आहे. सदरील निवड डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे दोन वर्षांसाठी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान निर्माण व्हावे तसेच त्यांना शारीरिक श्रम करण्याची आवड निर्माण व्हावी याकरिता प्रत्येक महाविद्यालयात रासेयोची स्थापना करण्यात येते. महाराष्ट्र शासन व विद्यापीठाचे विविध समाजोपयोगी उपक्रम रासेयोच्या माध्यमातून राबवले जातात. सदरील उपक्रम सुरळीतपणे राबवण्यासाठी विद्यापीठामार्फत गट समन्वयकाची नियुक्ती केली जाते. डॉ. राम कदम यांच्याकडे तुळजापूर, उमरगा व लोहारा तालुक्यातील महाविद्यालयांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

***Name of the News Paper :*** दै दिव्य मराठी ***Date :*** 18/08/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## आर्थिकबरोबर सांस्कृतिक विकासाची गरज

डॉ. अस्वले : श्रीकृष्ण महाविद्यालयात कार्यक्रम

उमरगा, ता. २८ (बातमीदार) : शिक्षण हे समाजसेवेचे, समाज परिवर्तनाचे साधन आहे. मराठवाड्याला आर्थिक विकासाबरोबर सांस्कृतिक विकासाची गरज होती. विद्यापीठ स्थापनेमुळे मराठवाड्याच्या आर्थिक, सांस्कृतिक विकासाला मोठा हातभार लागला, असे मत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रा. डॉ. संजय अस्वले यांनी व्यक्त केले.

गुंजोटी (ता. उमरगा) येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. अस्वले बोलत होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सरचिटणीस कॉ. अरुण रेणके, श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे उपाध्यक्ष प्रभाकरराव हिरवे, प्राचार्य दिलीप कुलकर्णी, डॉ. सुहास मोहरीर आदींची या वेळी उपस्थिती होती.

डॉ. अस्वले म्हणाले की, शिक्षणामुळेच संस्कृतीचे जतन होते व त्या भागाचा विकास होऊ शकतो. १९५८ मध्ये मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. पण मराठवाड्याचा संस्कृतिक व अर्थिक विकासास उच्च शिक्षणाचे योगदान आहे काय? विद्यापीठाची भूमिका काय आहे, उच्च शिक्षणाची दशा आणि दिशा काय याबाबत विचारमंथन होणे गरजेचे असून, नवीन बदलांचा स्वीकार करून आव्हानांना सामोरे जाणे ही काळाची गरज आहे.

अध्यक्षीय समारोपात श्री. रेणके यांनी समाजाचा एक घटक म्हणून शिक्षकांनी आदर्श कार्य करावे व शिक्षणाला एक नवी दिशा द्यावी, असे आवाहन केले. प्रा. संजय बडोदकर यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. डी. पी. चव्हाण यांनी आभार मानले.

***Name of the News Paper :*** दै. सकाळ ***Date :*** 29/08/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## शिक्षणामुळे संस्कृतीचे जतन होऊन विकासाला हातभार लागतो

### गुंजोटीत विद्यापीठ वर्धापनदिनात डॉ. अस्वले यांचे मत

प्रतिनिधी । उमरगा

तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे डॉ. संजय अस्वले म्हणाले की, १९५८ मध्ये मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. ६० वर्षात मराठवाड्याचा सांस्कृतिक व आर्थिक विकासात उच्च शिक्षणाचे सर्वाधिक योगदान आहे काय, विद्यापीठाची भूमिका काय आहे, उच्च शिक्षणाची दशा आणि दिशा, याबाबत विचारमंथन आणि बदलांचा स्वीकार करून आव्हानांना सामोरे जाणे विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्ताने गरजेचे आहे. शिक्षणामुळे समाजसेवा आणि समाज परिवर्तनाचे आत्मज्ञान प्राप्त होते. तसेच संस्कृतीचे जतन होऊन विकास होण्यास मदत होते, असे मत अस्वले यांनी व्यक्त केले.

भाकपचे जिल्हा सरचिटणीस अरुण रेणके अध्यक्षस्थानी होते. यावेळी श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे, प्रभाकर हिरवे, प्राचार्य दिलीप कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी रेणके यांनी शिक्षकांनी समाजाचा एक घटक म्हणून आदर्श कार्य करून शिक्षणाला नवीन दिशा देण्याचे काम करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाला प्राध्यापक, विविध विभागांचे प्रमुख, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

***Name of the News Paper :*** दै. दिव्य मराठी ***Date :*** 29/8/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## शिक्षकदिनी हाती झाडू घेऊन गुरुजींनी केली स्वच्छता

उमरगा, दि. ६- तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून शिक्षकदिनी हातात झाडू घेऊन गुरुजी रस्त्यावर उतरले. गावातील मुख्य रस्तापासून ते संस्थेचा परिसर स्वच्छ करून आगळ्यावेगळ्या पद्धतीने शिक्षकदिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, डॉ. विलास होगाडे, डॉ. रमेश पात्रे, रासेयो समनवयक डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. जी. एम. राठोड यांच्यासह विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दत्तक गाव एकोंडी, इंद्रधनू वृद्धसेवा केंद्र, गुंजोटी व रामलिंग मुदगड येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याचे प्राचार्य कुलकर्णी यांनी सांगितले. त्याचबरोबर शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गुंजोटी व परिसरातील कुटुंबांना गृहभेटी देऊन शौचालय बांधकामासह शौचालय वापराचे फायदे विद्यार्थ्यांच्या माध्यमातून वर्षभर जनजागृती करण्यात येणार असल्याचे राम कदम यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी डॉ. सुनील पतंगे, डॉ. पठाण, डॉ. रमेश मादळे, महादेव खोत, एम. जी. अंबुसे आदीसह राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

***Name of the News Paper :*** दै. संचार ***Date :*** 07/09/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CS CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## भक्ती कोरेकरची राष्ट्रीय पातळीवर निवड



गुंजोटी । डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे नुकत्याच झालेल्या आंतरमहाविद्यालयीन मैदानी क्रीडा स्पर्धेत श्रीकृष्ण महाविद्यालयाची विद्यार्थिनी भक्ती कोरेकर थाळीफेक क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक पटकावले आहे. तिची राष्ट्रीय स्तरावर निवड झाल्यामुळे महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आचार्य नागार्जुन विद्यापीठ, गुंटूर येथे होणार आहे. यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. शाईवाले अण्णा, उपाध्यक्ष प्रभाकरराव हिरवे, सचिव डॉ. दा. ब. पतंगे, प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी व डॉ. रमेश पात्रे यांनी शुभेच्छा दिल्या.

***Name of the News Paper :*** दै दिव्य मराठी ***Date :*** 08/10/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## गुंजोटीत विद्यार्थ्यांची स्वच्छता मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

गुंजोटी : उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व ग्रामपंचायतीच्या वतीने २ [illegible] ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

यावेळी सरपंच शंकरराव पाटील, उपसरपंच शिवाजीराव गायकवाड, प्राचार्य डी.आर. कुलकर्णी, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, डॉ.डी.पी. चव्हाण, डॉ.एम.जी. अंबुसे, ग्राम पंचायत सदस्य दीपक आगसे, अमर नाईकवाडे, ग्रामविकास अधिकारी हलबुर्गे, प्रा.बी.जे. बोटेवाड यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. दत्तक गाव एकोंडी येथे शौचालय वापराचे महत्त्व, स्वच्छतेसाठी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून प्रयत्न केले जात असल्याचे रासेयोचे जिल्हा समन्वयक डॉ.राम कदम यांनी सांगितले.



गुंजोटी येथील स्वच्छता मोहिमेत सहभागी विद्यार्थी, प्राध्यापक.

**Name of the News Paper :** दै. लोकमत **Date :** 10/10/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



गुंजोटी (ता. उस्मानाबाद) : गावामध्ये स्वच्छता मोहीम राबविताना श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी.

## गुंजोटीत विद्यार्थ्यांतर्फे ग्रामस्वच्छता मोहीम

गुंजोटी, ता. १० (बातमीदार) : येथील श्रीकृष्ण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व ग्रामपंचायतीच्या वतीने दोन ते १५ ऑक्टोबर या कालावधीमध्ये ग्रामस्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. सरपंच शंकर पाटील, उपसरपंच शिवाजी गायकवाड, ग्रामविकास अधिकारी श्री. हलबुर्गे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. एच. कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे व प्रा. बी. जी. बोटेवाड यांच्यासह विद्यार्थ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला आहे. दत्तक गाव एकोंडी येथे स्वच्छतागृहाच्या वापराचे महत्त्व व स्वच्छतेसाठी सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत, असे राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. आर. एच. कदम यांनी सांगितले.

***Name of the News Paper :*** दै सकाळ ***Date :*** 11/10/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

अवतीभवती



गुंजोटी (ता. उमरगा) : केंद्रीय युवक महोत्सवात आदिवासी लोकनृत्यामध्ये द्वितीय क्रमांक मिळविलेल्या येथील श्रीकृष्ण महाविद्यालयातील कलाकारांसमवेत प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, प्रा. प्रमोद चौधरी, अनिल काळदाते, प्रा. डॉ. एम. जी. अंबुसे.

## केंद्रीय युवक महोत्सवात श्रीकृष्ण महाविद्यालयाचे यश

गुंजोटी, ता. ६ (बातमीदार) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या केंद्रीय युवक महोत्सवात येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रा. प्रमोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कलाप्रकार सादर केले. यामध्ये आदिवासी लोकनृत्य स्पर्धेत महाविद्यालयाने सादर केलेल्या हरयाणवी सामूहिक नृत्यास द्वितीय क्रमांक मिळाला आहे. या संघात स्वाती गुंजोटे, अवणी रेणके, सायली राखेलकर, सारिका पाटील, संतोषी गायकवाड, अंबिका इब्रामपुरे, बेदी काकडे, वसुंधरा पाटील यांच्या समूहाने द्वितीय पुरस्कार पटकाविला. या यशाबद्दल श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. डी. बी. पतंगे, अध्यक्ष डॉ. राघवेंद्र शाईवाले, प्राचार्य डॉ. दिलीप कुलकर्णी, ग्रंथपाल अनिल काळदाते आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

***Name of the News Paper :*** दै सकाळ ***Date :*** 07/11/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



केंद्रीय युवक महोत्सवात आदिवासी लोकनृत्य सादर करून गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य डी. आर. कुलकर्णी व अन्य.

## केंद्रीय युवक महोत्सवातील यशाबद्दल सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

गुंजोटी : येथील श्रीकृष्ण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी औरंगाबाद येथे आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ केंद्रीय युवक महोत्सवात आदिवासी लोकनृत्य स्पर्धेत सामूहिक नृत्य सादर करून द्वितीय क्रमांक पटकाविला.

यात वसुंधरा पाटील, अवनी रेणके, स्वाती गुंजोटे, सारिका पाटील, सायली राखेलकर, संतोषी गायकवाड, अंबिका इब्राहिमपुरे, बेबी काकडे यांच्यासह इतर विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा. प्रमोद चौधरी यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचा संस्थाध्यक्ष डॉ. राघवेंद्र शाईवाले, सचिव डॉ.दामोदर पतंगे, उपाध्यक्ष प्रभाकरराव हिरवे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, एम. जी. अंबुसे, ग्रंथपाल अनिल काळदाते, प्रा.पी.जी. चौधरी, मंथन सूर्यवंशी यांनी सत्कार केला.

**Name of the News Paper :** दै लोकमत

**Date :** 8/11/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CS CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## प्राचार्य डॉ. कुलकर्णी, प्रा. नन्नवरे यांना डी.लिट.

गुंजोटी, ता. १३ (बातमीदार) : डॉ. एस. राधाकृष्णन रिसर्च, ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट सेंटर व टिचर वेलफेअर संस्था बंगळुरू, संलग्नित युनिव्हर्सिटी ऑफ साऊथ अमेरिका, मोण्टेव्हिडिओ अमेरिकास्थित विद्यापीठाने श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप राजाराम कुलकर्णी व गणिताचे प्रा. डॉ. जगदीश अश्रुबा नन्नवरे यांना डी.लिट. (डॉक्टर ऑफ लेटर्स) ही मानद पदवी बहाल केली आहे.

प्राचार्य डॉ. दिलीप कुलकर्णी हे रसायनशास्त्र विषयाचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधनकार्य, महाविद्यालयीन, राष्ट्रीय मूल्यांकनासाठी मार्गदर्शन, संशोधन मार्गदर्शक, महाविद्यालय व विद्यार्थी विकास मंडळ, अभ्यासक्रमेतर उपक्रम व उच्चशिक्षण विस्तार अशा जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. त्यांचे आतापर्यंत नामांकित आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय नियतकालिकांमध्ये सोळा शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

गणित विषयाचे प्रा. डॉ. जगदीश नन्नवरे हे १९९६ पासून कार्यरत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा



प्राचार्य डॉ. दिलीप कुलकर्णी



प्रा. डॉ. जगदीश नन्नवरे

विद्यापीठाच्या गणित अभ्यास मंडळाच्या सदस्यपदी, विद्यापीठीय गणित अभ्यासक्रमाच्या चार पुस्तकांचे लेखन, महाविद्यालयात आयक्युएसी समन्वयक, युनिव्हर्सिटी ग्रँड कमिशन (यूजीसी) समन्वयक म्हणून योगदान व आतापर्यंत यांचे नामांकित अंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय नियतकालिकांमध्ये बावीस शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय परिषदामध्ये सत्तावीस शोधनिबंधांचे वाचन केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. राघवेंद्र शाईवाले, उपाध्यक्ष प्रभाकर हिरवे, सचिव डॉ. दामोदर पतंगे, सर्व कार्यकारिणी सदस्य, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. किशन लोहार, गणित विभागप्रमुख प्रा. हनुमंत भोसले व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

***Name of the News Paper :*** दै सकाळ ***Date :*** 14/11/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात हुतात्मा वेदप्रकाश यांच्या प्रतिमेचे पूजन करताना प्राचार्य डी. आर. कुलकर्णी व प्राध्यापक.

## बलिदान दिनानिमित्त अभिवादन

गुंजोटी : येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात बुधवारी हुतात्मा वेदप्रकाश बलिदान दिननिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. कार्यक्रमास डॉ. एम. टी. सूर्यवंशी, डॉ. बालाजी कोनाळे, डॉ. किशन लोहार, डॉ. दस्तगीर पठाण, डॉ. सुनील पतंगे, डॉ. ए. एम. चिश्ती, प्रा. आर. जी. कोळी, प्रा. एच. एस. भोसले, डॉ. डी. पी. चव्हाण यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

***Name of the News Paper :*** दै. लोकमत ***Date :*** 23/11/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## गुंजोटीतील श्रीकृष्ण महाविद्यालयात कार्यक्रम



प्रतिनिधी । गुंजोटी

उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात सोमवारी (दि.२७) संविधान दिन मोठ्या विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. सर्वप्रथम भारतीय संविधान ग्रंथाचे प्राचार्य दिलीप कुलकर्णी यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यांनतर उपस्थित सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांकडून घटनेच्या सारणामाचे वाचन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ग्रंथालयात व महाविद्यालयाच्या परिसरात भारतीय राज्यघटनतेतील मूलभूत अधिकार व कर्तव्ये याबाबतचे तयार करण्यात आलेल्या भीती पत्रकाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्रा. एन. जे. पवार, प्रा. एम. सी. खोत, डॉ. बालाजी कोनाळे, प्रा. पी. एस. राऊत, प्रा. पठाण, प्रा. एम. जी. अंबुसे, डॉ. आर. एच. कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. रमेश पात्रे, प्रा. ए. एम. चिस्ती, सर्व कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

***Name of the News Paper :*** दै. दिव्य मराठी ***Date :*** 29/11/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

## शिष्यवृत्तीसाठी संकेतस्थळ माहिती फलकाचे अनावरण



शिष्यवृत्तीसाठीचे एकत्रित संकेतस्थळाच्या फलकाचे अनावरण करतेवेळी प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांच्यासह मान्यवर.

लोकमत न्यूज नेटवर्क

गुंजोटी : २०१७-१८ पासून विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी एकत्रित संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. उमरगा तालुक्यातील श्रीकृष्ण महाविद्यालयात याची माहिती दर्शविणाऱ्या भित्तीफलकाचे अनावरण प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

महाडीबीटी असे हे या संकेतस्थळाचे नाव असून, हे संकेत स्थळ संचालक, माहिती व तंत्रज्ञान यांच्या मार्फत कार्यान्वित करण्यात आले आहे. सामाजिक न्याय विभागाच्या शिष्यवृत्ती/ शिक्षण फी परीक्षा/ विद्यावेतन/ निर्वाह भत्ता वितरित करावयाच्या योजनांचा समावेश या संकेतस्थळावर राहणार आहे. यापुढे विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फॉर्म हे ऑनलाईन पद्धतीनेच भरावे लागणार असून, महाविद्यालयाच्या आवारात महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी, यासाठी यासाठी भित्ती फलकाची व्यवस्था करण्यात आली असल्याचे प्राचार्य कुलकर्णी यांनी सांगितले. यावेळी डॉ. किशन लोहार, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. राम कदम, प्रा इब्राहिम इनामदार, विलास कटकधोंड, दिलीप कांबळे, प्रा. कोडे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

***Name of the News Paper :*** दै लोकमत ***Date :*** 12/12/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

दै लोकमत

Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

*Name of the News Paper :* दै. दिव्य मराठी *Date :* 18/12/2017

**शिबिर** श्रीकृष्ण महाविद्यालयाचे उमरगा तालुक्यातील एकोंडी येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर; ५० स्वयंसेवकांचा सहभाग

# विद्यार्थ्यांनी केली ग्रामस्वच्छता, जलसंधारणाची कामे

प्रतिनिधी । गुंजोटी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद अंतर्गत श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर उमरगा तालुक्यातील एकोंडी (ज.) येथे १५ ते २१ डिसेंबर दरम्यान सुरू आहे.

'स्वच्छ ग्राम व जल संवर्धनासाठी युवा' या विशेष शिबिराला येथे शुक्रवारपासून (दि.१५) सुरुवात झाली. शिबिरात ५० हून अधिक स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. सकाळी योग, प्राणायाम व कवायती, शोषखड्डे, ग्रामस्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, जलसंधारणाची कामे, रक्तदान, आरोग्य तपासणी, अंतर्गत रस्ते निर्मिती, सांस्कृतिक प्रबोधनपर कार्यक्रम आदी उपक्रम २१ तारखेपर्यंत राबविण्यात येणार आहेत. यामध्ये एकोंडीचे ग्रामस्थही सहभागी झाले आहेत.रासेयोचे जिल्हा समन्वयक प्रा. सूर्यकांत आगलावे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव दामोदर पतंगे अध्यक्षस्थानी होते. तडवळ्याचे शिवाचार्य राजेश्वर स्वामी, रोटरी क्लब उमरगाचे अध्यक्ष प्रवीण स्वामी, प्रा. डॉ. राम कदम, प्रा.डॉ. डी. पी. चव्हाण, सरपंच लक्ष्मी ताटे, शालेय समिती अध्यक्ष चंद्रशेखर सूर्यवंशी, विक्रम इंगळे-पाटील, व्यंकट सूर्यवंशी आदी यावेळी उपस्थित होते. विद्यापीठाने उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी म्हणून प्रा. डॉ. राम कदम व प्रा.डॉ. डी. पी. चव्हाण यांची निवड झाल्याबद्दल, त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी आगलावे म्हणाले, शाळा, महाविद्यालय आणि रासेयोच्या शिबिरातून समाजकारण करत नेतृत्वगुण विकसीत होते. याप्रसंगी डॉ. दामोदर पतंगे, शिवाचार्य राजेश्वर स्वामी, प्रवीण स्वामी, चंद्रशेखर सूर्यवंशी यांचीही भाषणे झाली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. दिलीप कुलकर्णी यांनी केले. गीता जगताप यांनी सूत्रसंचालन केले, आभार प्रा. डॉ. राम कदम यांनी मानले.



उमरगा तालुक्यातील एकोंडी येथे रोसेयोचे जिल्हा समन्वयक प्रा. सूर्यकांत आगलावे यांच्या हस्ते शुक्रवारी शिबिराचे उद्घाटन झाले.

CS CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***

# राष्ट्रीय सेवा योजना एकात्मतेचे सशक्त साधन : राजेश्वर स्वामी

संचार वृत्त सेवा

उमरगा, दि. १७ - शिक्षित जनशक्तीच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करून उत्तम राष्ट्रभक्त नागरिक घडविण्याची प्रक्रिया म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. आपल्या महाविद्यालयाने एकोंडी गाव दत्तक घेऊन त्याचा विकास साधण्याकरिता गावाच्या आवश्यकतेनुसार नियोजित प्रकल्प प्रतीकात्मक स्वरुपात विद्यार्थ्यांनी कार्यान्वित करावेत. त्यातून त्यांचे संघटन कौशल्य निर्माण होईल. राष्ट्रीय सेवा योजना एकात्मतेचे सशक्त साधन मानले गेले आहे, असे मत बसवकल्याण तालुक्यातील तडोळा येथील मठाधीश शिवाचार्य राजेश्वर स्वामी यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दत्तक गाव एकोंडी (ज) येथे स्वच्छ ग्राम व जलसंवर्धनासाठी युवा शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे, रासेयोचे जिल्हा समन्वयक प्रा. सूर्यकांत आगलावे, सरपंच लक्ष्मीबाई ताटे, उमरगा रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रवीण स्वामी, प्राचार्य डी. आर. कुलकर्णी, माजी सरपंच विक्रम इंगळे, शालेय समिती अध्यक्ष चंद्रशेखर सूर्यवंशी, ग्रामपंचायत सदस्य संगीता पांचाळ, माजी सैनिक अशोक सुरवसे, ईश्वर सोनकांबळे, कार्यक्रम अधिकारी डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, प्रभाकर ताटे, विद्यार्थी प्रतिनिधी सतीश जाधव, विद्यार्थिनी प्रतिनिधी नीता जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.



एकोंडी : रासेयो शिबिराचे उद्घाटन मठाधीश राजेश्वर स्वामी यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. दामोदर पतंगे व अन्य.

शिबिर कालावधीत एकोंडी गावातील शोषखड्डे, स्वच्छता, वृक्षारोपण, जलसंधारण, अंतर्गत रस्ते निर्मिती, रक्तदान, आरोग्य तपासणी, सांस्कृतिक प्रबोधनपर कार्यक्रम, मतदार नोंदणी जनजागृती, शौचालय बांधकाम व नियमित वापरासाठी प्रवृत्त करणे, बेटी बचाव बेटी पढाव आदी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

***Name of the News Paper :*** दै. संचार ***Date :*** 18/12/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CS CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



एकोंडी येथे विशेष शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी शिवाचार्य स्वामी, डॉ. पतंगे, प्रवीण स्वामी, प्रा. आगलावे व इतर.

## 'रासेयो म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन'

लोकमत न्यूज नेटवर्क

गुंजोटी : शिक्षित जनशक्तीच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करून उत्तम राष्ट्रभक्त नागरिक घडविण्याची प्रक्रिया म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय, असे सांगून राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन मानले गेले असल्याचे मार्गदर्शन बसवकल्याण तालुक्यातील (कर्नाटक) तडोळा येथील मठाधीस्य शिवाचार्य राजेश्वर स्वामी यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दत्तक गांव एकोंडी (ज) येथे शुक्रवारी 'स्वच्छ ग्राम व जलसंवर्धनासाठी युवा शिबिरा'च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा समन्वयक प्रा. सूर्यकांत आगलावे, सरपंच लक्ष्मीबाई ताटे, उमरगा रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रवीण स्वामी, प्राचार्य डी. आर. कुलकर्णी, माजी सरपंच विक्रम इंगळे, चंद्रशेखर सूर्यवंशी, ग्रामपंचायत सदस्या संगीता पांचाळ, माजी सैनिक अशोक सुरवसे, ईश्वर सोनकांबळे, कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, प्रभाकर ताटे, बाळासाहेब येवते, विद्यार्थी प्रतिनिधी सतीश जाधव, विद्यार्थिनी प्रतिनिधी नीता जगताप आदी उपस्थित होते. सात दिवसीय शिबिराच्या माध्यमातून एकोंडी गावातील शोषखड्डे, स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, जलसंधारण, अंतर्गत रस्ते, रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी, सांस्कृतिक प्रबोधनपर, मतदार नाव नोंदणी जागृती, शौचालय बांधकाम व नियमीत वापरण्यासाठी प्रवृत्त करणे आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. स्वामी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच वेळेचे महत्त्व पटवून घ्यायला पाहिजे. आपल्या जीवनात • वेळेला व नि:स्वार्थपणे करणाऱ्या कार्याला जो महत्त्व देईल तो यशस्वी जीवन जगेल. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रवीण स्वामी यांनीही मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डी. आर. कुलकर्णी यांनी प्रस्ताविक केले. कार्यक्रमासाठी डॉ. गुलाब राठोड, प्रा. प्रमोद चौधरी, डॉ. मिलिंद सूर्यवंशी, डॉ. रमेश पात्रे, प्रा. योगिराज विजापुरे, प्रा. संजय बडोदकर, विनोद पतंगे, प्रा. बालाजी बोटेवाड, प्रा. पी. एस. कुंचगे, प्रा. पी. ए. होटगे यांच्यासह प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते. गीता जगताप यांनी सूत्रसंचालन तर डॉ. आर. एच. कदम यांनी आभार मानले.

***Name of the News Paper :*** दै. लोकमत ***Date :*** 18/12/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***



## एकोंडीत स्वच्छ ग्रामसाठी सरसावले विद्यार्थी

**प्रतिनिधी**

**उमरगा :** उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वच्छ ग्राम व जलसंवर्धनासाठी युवा शिबिर घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांच्या व एकोंडी ग्रामपंचायतीच्या सहकार्याने एकोंडी येथे मागील पाच दिवसांपासून ग्रामस्वच्छते सहित श्रमदानाची विविध कामे केली. गावात शौचालय वापराचे महत्व, पंतप्रधान बिजली योजना, बेटी बचाव बेटी पढाव, पंतप्रधान घरकुल योजना, मतदार, आधार नोंदणीचे जनजागरण व माहिती घेण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. दि. १५ डिसेंबर ते २१ डिसेंबर या शिबीराच्या दरम्यान रस्त्यावरील मुरूम टाकने, एकोंडी येथील जिल्हा परिषद शाळेचे परिसर स्वच्छता करने, घनकचरा निर्मूलन, घरकुल निमित्त प्रत्यक्ष घराची पाहणी, गटार स्वच्छता विद्यार्थ्यांच्या माध्यमातून कामे करण्यात आले. विशेष शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. सुर्यकांत आगलावे, संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे, प्राचार्य डॉ. आर. कुलकर्णी, डॉ. राम कदम, सरपंच सौ. लक्ष्मीबाई वाटे, डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, विक्रम इंगळे, चंद्रशेखर सुर्यवंशी आदि मान्यवरांची उपस्थिती होती.

शिबीराच्या दरम्यान आरोग्य शिबिरासह उपजिल्हा रूग्णालय उमरगा यांच्यावतीने हिमोग्लोबिन तपासणे, एड्स जनजागृती व अनेकांचे मार्गदर्शन झाले.

**Name of the News Paper :** दै. एकमत **Date :** 21/12/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

*Accredited by NAAC with 'B' Grade*

**रासेयो शिबीर :** शासनाच्या विविध योजनांबाबतही केली जनजागृती

# स्वच्छग्रामसाठी एकोंडीत सरसावले विद्यार्थी

लोकमत न्यूज नेटवर्क

**गुंजोटी :** उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वच्छग्राम व जलसंवर्धनासाठी युवा शिबिरात विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांच्या व ग्रामपंचायतच्या सहकार्याने पाच दिवसांपासून ग्रामस्वच्छतेसही श्रमदानाची विविध कामे हाती घेतली आहेत. गावात शौचालय वापराचे महत्त्व, पंतप्रधान बिजली योजना, बेटी बचाव बेटी पढाव, पंतप्रधान घरकुल योजना, मतदार, आधार नोंदणीचे जनजागरण व माहिती घेण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, व गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे विशेष शिबीर १९ डिसेंबर ते २१ डिसेंबर या कालावधीत होत आहे. शिबिरा दरम्यान रस्त्यावरील मुरूम टाकणे, एकोंडी येथील जिल्हा परिषद शाळेचे परिसर स्वच्छता करणे, घनकचरा निर्मूलन, घरकुलनिर्मित प्रत्यक्ष पाहणी पाहणी, गटार स्वच्छता विद्यार्थ्यांच्या माध्यमातून कामे करण्यात आली.



एकोंडी येथे गुंजोटी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिरार्थी व ग्रामस्थांनी ग्रामस्वच्छतेचे कामे केले.

## रक्तदान शिबीर

- शिबिरादरम्यान १९ डिसेंबर रोजी सकाळी रक्तदान शिबीर तसेच सात महिलांची हिमोग्लोबिन तपासणी, एड्स जनजागृती कार्यक्रमही घेण्यात आला. यासाठी उपजिल्हा रुग्णालय उमरग्याचे डॉ. मोहिब मोमिन, पद्माकर घोंगे, अनिल चव्हाण, वाघमारे, श्रीकृष्ण महाविद्यालयाचे कर्मचारी उपस्थित होते. २० डिसेंबर रोजी 'ग्रामविकासात तरुणांचा सहभाग' या विषयावर प्रमानलवाल येथील जयंत पाटील यांचे व्याख्यान झाले.

शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. सूर्यकांत जागलाचे, संस्थेचे सचिव डॉ. दामोदर पतंगे, प्राचार्य डी. आर. कुलकर्णी, डॉ. राम कदम, सरपंच लक्ष्मीबाई ताटे, डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, विक्रम इंगळे, चंद्रशेखर सूर्यवंशी आदी उपस्थित होते. शिबिरादरम्यान आरोग्य शिबिरासह अनेकांचे मार्गदर्शनही झाले.

Name of the News Paper : लोकमत

Date : 21/12/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

CS CamScanner

# Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti

Tq. Omerga Dist. Osmanabad

***Accredited by NAAC with 'B' grade***


## युवकांना आदर्श नागरिक बनविण्याचे धडे

गुंजोटी, ता. २१ (बातमीदार) : राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन युवकांना आदर्श भारतीय नागरिक बनविण्याचे धडे देते. स्वावलंबन, स्वयंशिस्त, श्रमदान व समाजाचे देणे देत राष्ट्रसेवा घडविण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेच्या समारोप समारंभात एकोंडी येथे प्राचार्य डॉ. दिलीप कुलकर्णी यांनी गुरुवारी (ता. २१) केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने एकोंडी (जहांगीर) येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिबिराचा समारोप गुरुवारी झाला. त्यावेळी डॉ. कुलकर्णी बोलत होते.

शिबिर कालावधीत स्वयंसेवकांनी संपूर्ण गावात ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, जलसंधारणाची कामे, रक्तदान शिबिर व हिमोग्लोबिन तपासणी, अंतर्गत रस्ते निर्मिती, समाज प्रबोधनपर कार्यक्रम आदी उपक्रम सात दिवसांत राबविले. शिबिरादरम्यान रोटरी क्लबच्या डॉ. सुचेता पोफळे यांनी 'बेटी बचाव बेटी पढाव' या विषयावर, प्रा. रामदास कोळी यांनी 'जलसंवर्धन काळाची गरज' या विषयांवर, प्रा. डॉ. महेश मोटे यांनी 'अंधश्रद्धा निर्मूलन,' तर प्रा. डॉ. बालाजी कोनाळे यांनी एड्सविषयी जनजागृतीपर मार्गदर्शन केले.

उस्मानाबादचे जयंत पाटील यांनी ग्रामविकासात तरुणांचा सहभाग याविषयी युवकांना मार्गदर्शन केले.

प्रा. प्रमोद चौधरी यांनी समाज प्रबोधनात्मक एकपात्री प्रयोग करत स्वयंसेवकांमार्फत गावात

**Name of the News Paper :** दै. सकाळ **Date :** 22/12/2017

**INFORMATION AND PUBLICITY COMMITTEE**

# Photos and News of NSS activity 2018-19

सकाळ



गुंजोटी (ता. उमरगा) : येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात झालेल्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. दिलीप कुलकर्णी.

## श्रीकृष्ण महाविद्यालयात कार्यक्रम

**गुंजोटी :** येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात जागतिक अपंग दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सोमवारी (ता.तीन) कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्राचे संचालक तथा निवडणूक नोडल अधिकारी प्रा. राजेंद्र निगडे यांनी दिव्यांगांनी निवडणूक प्रक्रियेत सहभाग नोंदवत मोठ्या प्रमाणात मतदान करण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांचेही भाषण झाले. राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. राम कदम, प्रा. डॉ. दिगंबर चव्हाण, प्रा. डॉ. एम. जी. अंबुसे यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला.

Aurangabad, Osmanabad-Today
04/12/2018 Page No. 3

International Disability Day



गुंजोटीच्या श्रीकृष्ण विद्यालयातील विद्यार्थिनींनी श्रावणमासानिमित्त उमरगा येथील महादेव मंदिरात स्वच्छता मोहीम राबविली.

## विद्यार्थिनींकडून मंदिर परिसरात स्वच्छता

गुंजोटी : येथील श्रीकृष्ण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनींनी श्रावण मासानिमित्त उमरगा येथील हेमाडपंती महादेव मंदिरात स्वच्छता मोहीम राबविली. हे महादेव मंदिर ऐतिहासिक असून, श्रावण महिन्यात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होते. स्वच्छतेअभावी भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी ही मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमासाठी प्रचार्य डी. आर. कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे, दिलीप कांबळे यांनी मार्गदर्शन केले.

Cleaning Campaign

लोकमत

गावा-गावांत मोहीम : विद्यार्थ्यांसोबतच ग्रामस्थांनीही घेतला पुढाकार

## 'स्वच्छता ही सेवा' अभियानास जिल्ह्यात प्रतिसाद





### गुंजोटीत पथनाट्याद्वारे जनजागृती

Cleaning Campaign

## मुलींनी बांधली वेल-फुलाची राखी

